


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २१४ ■ मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# विद्यार्थ्यांचे टेन्शन अन् पालकांच्या धाकधुकीत बारावीच्या परीक्षेला प्रारंभ

## ▶▶२७ हजार ३५ परीक्षार्थी, ८७ परीक्षा केंद्र ▶▶परीक्षा केंद्रांवर गुलाबपुष्प देत विद्यार्थ्यांचे स्वागत





प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**अकोला** : आज मंगळवारपासून बारावीच्या परीक्षेला सकाळी ११ वाजतापासून प्रारंभ झाला आहे. सकाळी दहा वाजतापासूनच विद्यार्थी आपल्या पालकांसह परीक्षा केंद्रांवर पोहोचले.

यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर टेन्शन तर पालकांच्या मनामध्ये धाकधुकीचे भाव दिसून येत होते. तर शिक्षण विभागाने हे वातावरण निवळण्यासाठी परीक्षा केंद्रावरच विद्यार्थ्यांच्या हाती गुलाबपुष्प देत आनंदात स्वागत करण्यात येत असल्याचे चित्र आज सर्वच परीक्षा केंद्रांवर दिसून आले.

त्यामुळे विद्यार्थ्यांचे टेन्शन कुठेच्या कुठे पळून ते आनंदाने आतमध्ये प्रवेश करताना पाहून पालकांनाही हायसे वाटले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी बारावीची परीक्षा आज, मंगळवारी १० फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. अमरावती विभागत यावर्षी एकूण १ लाख ५७ हजार २६७ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. अकोला जिल्ह्यात ८७ परीक्षा केंद्रांवर २७ हजार ३५ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

### मान्यवरांनी वाढविले विद्यार्थ्यांचे मनोबल

आज पहिल्या पेपरच्या दिवशी परीक्षा केंद्रांच्या बाहेर उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. यावेळी माजी उपमहापौर व नवनिर्वाचित नगरसेवक रफीक सिद्दीकी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश संघटक सचिव जावेद झकरिया, समाजसेवक कमलेश माहेश्वरी, मन्नान सिद्दीकी तसेच कच्छी मेमन जमातीचे सामाजिक कार्यकर्ते हुरून आमदनी यांनी परीक्षा केंद्रांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना फुले देऊन 'बेस्ट ऑफ लक' केले. या आत्मीय स्वागतामुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा व आत्मविश्वास दिसून आला. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या वतीने सर्व परीक्षार्थींना परीक्षेत यश व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### गैरप्रकार रोखण्यासाठी गुगल मीट, झूमचा वापर

दहावी व बारावीच्या परीक्षा पारदर्शक पद्धतीने पार पडाव्यात, यासाठी जिल्हा दक्षता समितीच्या अध्यक्षांना आवश्यक नियोजन करण्याची मुभा देण्यात आली आहे. सीसीटीव्ही नसलेल्या काही केंद्रांवर गुगल मीट आणि झूम प्रणालीचा वापर केला जाणार आहे. भरारी पथकांना आकस्मिक भेटी देण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, विभागीय मंडळांतर्गत विशेष व बैठी पथकेही नियुक्त करण्यात आली आहेत. बैठे पथक असतानाही, उपद्रव झाल्यास संबंधित केंद्रावरील, तसेच पथकातील कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

### यंदाही १० मिनिटांचा अतिरिक्त वेळ

विद्यार्थ्यांनी केवळ राज्य मंडळाने प्रसिद्ध केलेले आणि छापील वेळापत्रकच ग्राह्य धरावे. यंदाही परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटांची अतिरिक्त वेळ देण्यात येणार आहे. शिक्षण विभागाच्या ९ जानेवारीच्या सरकारी निर्णयानुसार परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स केंद्रे बंद ठेवणे, तसेच परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

### गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर दखलपात्र गुन्हा

सर्वच परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. एवढे असूनही कोणत्याही केंद्रावर गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याची जबाबदारी जिल्हा दक्षता समितीवर राहणार आहे, अशी माहिती डॉ. बेडसे यांनी दिली.

# सुनेत्रा पवारांनी स्वीकारली उपमुख्यमंत्री पदाची सूत्रे



प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**मुंबई** : राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री बनल्या आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांचा शपथविधी पार पडला, त्यानंतर आज, १० फेब्रुवारी रोजी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली आहे. मुंबई येथील श्री सिध्दिविनायक गणपती मंदिरात दर्शन घेतल्यानंतर सुनेत्रा पवारांनी पदभार स्वीकारला. दरम्यान यानंतर त्यांनी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट केली आहे.

सुनेत्रा पवार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत आगामी काळात उपमुख्यमंत्री म्हणून काम करत असताना त्यांची काय भूमिका असेल याबद्दल भाष्य केले आहे. सुनेत्रा पवार म्हणाल्या की, 'आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारत असताना विश्वासाची, कर्तव्याची आणि त्यागाची जाणीव सुद्धा आहे. अजितदादांनी आयुष्यभर महाराष्ट्राच्या जनतेसाठी झटत विकासाचा जो ध्यास घेतला, तोच माझ्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. दादांची कार्यशैली, निर्णयक्षमता आणि लोकांशी असलेले आत्मीय नाते, हेच बळ घेऊन मी पुढील वाटचाल करणार आहे. त्यांच्या अपूर्ण स्वप्नांना पूर्णत्व देणे, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देणे, हीच माझी प्राथमिकता असेल.

' 'दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही; पण त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि अधिक सक्षम महाराष्ट्र घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी नक्की करेन. या कठीण प्रसंगी जनतेने दिलेले प्रेम, आधार आणि विश्वास हेच माझे सामर्थ्य आहे. त्यांच्या स्मृतीपुढे आज मी एकच वचन देते की, महाराष्ट्राच्या हितासाठी निष्ठेने आणि समर्पणाने कार्य करत राहीन.'

# शासकीय रुग्णालयात यापुढेही मोफतच उपचार !

## महायुती सरकारचे घूमजाव ; 'अनावधानाने चूक झाल्याची कबुली

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**मुंबई** : शासकीय रुग्णालयातील उपचारांच्या दरपत्रकाबाबत सरकारने एक परिपत्रक काढले होते. यामुळे मोठा वाद निर्माण होऊन सर्वसामान्यव गरीब रूग्णांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली होती. तसेच अनेक वृत्तपत्रांनीही हा मुद्दा रेटून धरला होता. अखेर या वादावर पडदा टाकताना सरकारने अनवधानाने परिपत्रकात दरांचा उल्लेख केला, अशी चूक कबूल करीत नव्याने शुद्धीपत्रक काढून शासकीय रुग्णालयात मोफतच उपचार होतील असे स्पष्ट केले आहे.

सरकारने स्पष्टीकरण दिले की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय रुग्णालयामधील तपासणी व उपचार हे शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २३ ऑगस्ट २०२३ च्या शासन निर्णयान्वये अन्वये निशुल्क करण्यात आलेले असून ते आजही पूर्वीप्रमाणेच नि:शुल्क आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाने १६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या नागरिकांच्या सनदेमधील परिशिष्ट-तीन मध्ये सेवा सुविधा पुरविण्यासाठी ६ जून २०१५ च्या शासन निर्णयातील शासन मान्य दर अनवधानाने समाविष्ट झाले.

### ५ ते ४० हजार रूपयांपर्यंत होते दर!

प्राथमिक आरोग्य केंद्रापासून ते जिल्हा रुग्णालयापर्यंत हे दर लागू होणार होते. त्यात केसपेपरसाठी ५ रुपये ते सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी ४० हजारांचे शुल्क आकारण्यात येणार होते. २०२३ साली तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी राज्यातील सर्वच आरोग्य विभागाच्या रुग्णालयात मोफत उपचार केले जातील, असा धाडसी निर्णय घेतला होता. त्याची अंमलबजावणी १५ ऑगस्ट २०२३ पासून सुरू झाली. तेव्हापासून सर्व राज्यात मोफत उपचार सुरू होते. मात्र निवडणुका संपल्यानंतर पुन्हा सरकारने दर लागू केले की काय, असा प्रश्न नागरिकांना पडला होता. परंतु सरकारने त्यांची चूक कबूल करत सरकारी रुग्णालयातील उपचार निःशुल्क असतील, असे स्पष्ट केले आहे.

### असे आहे प्रकरण

१६ जानेवारी २०२६ रोजी सरकारने नागरिकांची सुधारित सनद प्रसिद्ध केली होती. त्यात वैद्यकीय उपचारांचे दर वाढल्याचे नमूद केले. ही माहिती अलीकडे अनेक वृत्तपत्रात छापून आली. त्यातून सरकारी रुग्णालयात यापुढे मोफत उपचार बंद अशी माहिती समोर आली. यावरून बराच वाद उभा राहिला. ग्रामीण भागातील लोक आजही मोठ्या प्रमाणात सरकारी रुग्णालयाचा लाभ घेतात. हे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर राज्यातील गोरगरीब जनता आणि गरजू रुग्णांमध्ये संतापाची लाट पसरली होती. त्यानंतर तातडीने या प्रकाराची दखल सार्वजनिक विभागाकडून घेण्यात आली. त्यानंतर अनवधानाने हे दर छापल्याची कबुली शासनाने दिली.

# शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा !

## पंतप्रधान मोदी यांनी केली विचारपूस

प्रतिनिधी १० फेब्रुवारी



**पुणे** : राष्ट्रवादीचे नेते, खासदार शरद पवार यांची प्रकृती बिघडल्यामुळे सोमवारी संध्याकाळी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. बारामतीतून येथून पुण्यातील रुबी रुग्णालयात आणून त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले. यावेळी त्यांची कन्या सुप्रिया सुळे यादेखील उपस्थित होत्या. सध्या त्यांची प्रकृती सुधारत असून, लवकरच ते बरे होतील, असे रूग्णालयीन सूत्रांनी सांगितले. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोनवरून शरद पवार यांच्या प्रकृतीबद्दल विचारपूस केली आहे.

शरद पवारांच्या प्रकृतीबाबत रुबीहॉल क्लिनिक कडून महत्त्वाची अपडेट देण्यात आली आहे. पवारांच्या प्रकृतीत आता सुधारणा होत आहे, अशी माहिती रुग्णालयातील डॉक्टर सायमन ग्रँट यांनी सकाळी दिली. शरद पवारांची प्रकृती आता स्थिर असून ते बरे होत असल्याचं डॉक्टरांकडून सांगण्यात आलं. काल त्यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांच्यावर काही उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना होत असलेला त्रास आता काही प्रमाणात कमी झाल्याचही डॉक्टरांचं म्हणणं आहे. मात्र खबरदारीचा उपाय म्हणून शरद पवारांना डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात आलं आहे. हॉस्पिटलच्या प्रोटोकॉलनुसार शरद पवारांवर उपचार सुरू आहे आणि त्यांच्या तब्येतीवर अतिशय बारकाईने लक्षात ठेवण्यात येत आहे असं सांगण्यात आलं. मात्र, कोणत्याही कार्यकर्त्यांनी आणि हितचिंतकांनी हॉस्पिटलच्या आवारात गर्दी करू नये, असं आवाहन रुग्णालयाकडून करण्यात आलं आहे.

# अमित शाहांनी अजितदादांच्या राष्ट्रवादीचे नाव घेणे टाळले !

## जि.प., पं.स. निवडणूक ; महायुतीचे वर्चस्व

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**नवी दिल्ली** : राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांचा निकाल काल जाहीर झाला. या निकालात सत्ताधारी महायुतीने पुन्हा एकदा वर्चस्व गाजवलं. सर्वच्या सर्व १२ जिल्हा परिषदांमध्ये महायुतीचा झेंडा फडकला. १२ पैकी ८ जिल्हा परिषदांमध्ये भाजप, तीन जिल्हा परिषदांमध्ये शिवसेना आणि पुणे जिल्ह्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीने बाजी मारली.

महायुतीच्या या विजयानंतर केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांनी एक्सवर पोस्ट करत महायुतीचं कौतुक केलं आहे. मात्र या पोस्टमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नाव घेतले नसल्याचे आता विविध चर्चांना उधाण आले आहे. जिल्हा परिषद निकालात एनडीएचं अभिनंदन करताना केवळ भाजप आणि शिवसेनेचा अमित शाह यांनी उल्लेख केला आहे. अमित शाह यांनी अभिनंदन करताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नाव घेणे टाळले आहे. निवडणूक कोणतीही असो, महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यातील जनतेचा मोदीजींच्या नेतृत्वाखालील भाजपप्रणित एनडीएवर विश्वास आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद निवडणुकीत एनडीएला मिळालेला प्रचंड विजय हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारवरील जनतेच्या विश्वासाचा विजय आहे.



### देवेंद्र फडणवीसांनी गाठली दिल्ली

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रात्री अचानक दिल्ली गाठल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलंय. मुख्यमंत्र्यांनी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची रात्रीतूनच भेट घेतल्याची चर्चा आहे. राज्यातल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांच्या या अचानक ठरलेल्या दिल्ली दौऱ्याला महत्त्व आले आहे. पुढील काही दिवसांत राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या विलिनीकरणाचे वेध लागू लागले आहेत. विलिनीकरणाबाबत राज्यातल्या मित्रपक्षांसोबत चर्चा सुरू झाल्याची माहिती आहे.

# 16 नगरसेवकांचे 16 फेब्रुवारीला ठरणार राजकीय भविष्य

## स्थायी समितीत भाजपचे वर्चस्व, सभापती कोण?

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**अकोला:** महानगरपालिकेच्या राजकारणात सोमवार, १६ फेब्रुवारी हा दिवस अत्यंत कळीचा ठरणार आहे. महापालिकेतील सर्वात शक्तिशाली आणि आर्थिक निर्णयांचे केंद्र असलेल्या स्थायी समितीच्या १६ सदस्यांची या दिवशी अधिकृत नियुक्ती होणार आहे. या निवडीसोबतच या १६ नगरसेवकांचे राजकीय भवितव्य पालटणार असून, सर्वांचे लक्ष 'स्थायी'च्या सभापती पदाकडे लागले आहे.

महापालिकेच्या सत्तेत बहुमतात असलेल्या भारतीय जनता पक्षाचे ९ नगरसेवक स्थायी समितीत जाणार आहेत. त्यामुळे या समितीवर भाजपचे पूर्णपणे वर्चस्व राहणार हे स्पष्ट आहे.पण, सभापती कोण होणार हा प्रश्न महत्वाचा असून त्याच्या हातात महापालिकेच्या आर्थिक गोष्टींच्या व महत्वपुर्ण निर्णयाच्या चाव्या असतील. दुसरीकडे, विरोधी बाकांवरील कॉंग्रेसचे ४ नगरसेवक समितीत स्थान मिळवतील. याशिवाय एमआयएम, वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना या पक्षांचा प्रत्येकी एक नगरसेवक स्थायी समितीत जाईल. महानगरपालिकेच्या तिजोरीची चाबी स्थायी समितीकडे असते. शहराचे बजेट, विकासकामांचे ठराव, निविदा प्रक्रिया आणि महत्त्वपूर्ण आर्थिक धोरणे याच समितीमार्फत मंजूर केली जातात. त्यामुळे १६ फेब्रुवारीला नियुक्त होणारे हे १६ सदस्य महापालिकेच्या आर्थिक नाड्या नियंत्रित करतील. स्थायी समितीसोबतच महापालिकेच्या इतर महत्त्वाच्या पदांसाठीही रस्सीखेच सुरू आहे. त्याच बरोबर सोमवार, १६ फेब्रुवारी रोजी महिला व बाल कल्याण समितीत ९ महिला सदस्य कोण जाणार हे पाहण्यासारखे असेल. या समितीचे सभापती, उपसभापती पद कोणाला मिळणार याची चर्चा सुरु झाली आहे. तर प्रत्येकी विस वीस नगरसेवक असणाऱ्या महापालिकेच्या चारही झोनच्या सभापती व उपसभापती पदावर कोणाची वर्णी लागते, याकडे कार्यकर्त्यांच्या नजरा आहेत.

अकोला महानगरपालिका
जनहित सर्वतोपरी




CMYK

सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# कर्ज निवारण योजनेची माहिती संकलित करण्याचे काम सुरू

**अमरावती:** जिल्ह्यातील सेवा सहकारी संस्थांचे थकीत कर्जदार शेतकरी सभासदांनी अद्यापही आधार कार्ड, फार्मर आयडी आणि इतर आवश्यक असलेली माहिती संबंधित सेवा सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती बँक शाखेला उपलब्ध करून दिलेली नसल्यास या सर्व शेतकरी सभासदांनी तातडीने उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शासनाने शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने प्रस्तावित कर्ज निवारण योजनेसंदर्भात माहिती मागविली आहे. याअनुषंगाने थकीत कर्जदार सभासदांची माहिती संकलित करुन विहीत नमुना प्रपत्र अ व ब मध्ये तयार करण्याचे काम संबंधित प्राथमिक कृषी पतपुरवठा सेवा सहकारी संस्था, तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा स्तरावर सुरु आहे. त्यानुसार सेवा सहकारी संस्थांचे थकीत सभासदांचे कर्ज खाते आणि इतर अनुषांगिक माहिती संकलित करण्याचे काम संस्था पातळीवर सुरु आहे.

# महापौर, उपमहापौर यांचा पदग्रहण सोहळा



प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**अमरावती:** महापौर श्रीचंद तेजवानी उपमहापौर सचिन भेंडे यांचा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे उपस्थितीत महानगरपालिकेच्या सभागृहात पदग्रहण समारंभ पार पडला. यावेळी आमदार रवी राणा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. पदग्रहण सोहळ्याला भाजपाचे तसेच युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. यावेळी महापालिका आयुक्त सोम्या शर्मा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# १२ फेब्रुवारीच्या देशव्यापी संपास संयुक्त किसान मोर्चाचा जाहीर पाठिंबा!

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**अमरावती:** देशव्यापी संपामध्ये केंद्र व राज्य सरकारचे कर्मचारी ,बँक, रेल्वे, विमा ,डिफेन्स या संघटित क्षेत्रातील कामगार कर्मचारी सहभागी आहेत. असंघटित कामगार कर्मचारी अंगणवाडी, आशा , शालेय पोषण आहार, कंत्राटी कामगार संपात आहे. त्यांचे सोबतीला शेतमजूर शेतकरी सहभागी आहेत. या सार्वत्रिक संपास संयुक्त किसान मोर्चा (एस के एम) चा जाहीर पाठिंबा आहे. स्वातंत्र्यानंतर कामगार, किसान, शेतमजूर या जन विभागाने अविरत संघर्षातून कामगार हिताचे कायदे, शेती व शेतकरी रक्षणार्थ कायदे, शेतमजुरांना कामाचा अधिकार, मनरेगा यासारखे हक्काचे कायदे मिळवून घेतले. संसदेतील बहुमताचा गैरवापर करीत भाजपा सरकारने हे सारे कायदे संपविले. याविरुद्ध देशव्यापी संपाची हत्यार उचलले आहे .म्हणून कामगार विरोधी चार श्रमसंहिता रद्द करा. शेतकऱ्यांसाठी एम एस पी चा कायदा करा .मनरेगा कायम करा .किसान मजूर असंघटित कामगारांकरता राष्ट्रीय पातळीवर पेन्शनचा कायदा करा. किमान दहा हजार रुपये पेन्शन द्या. कामाचे आठ तास कायम करा .वीज विधेयक २०२५ मागे घ्या. बियाणे विधेयक २०२५ मागे घ्या. शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र बजेट संसदेत सादर करा. भारत अमेरिका करारास विरोध. राष्ट्रीय संपत्तीचे निर्गुंतवणुकीकरण थांबवा. सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण-कंपनीकरण थांबवा.

# रत्नाबाई राठी हायस्कूल येथे स्पर्धा परीक्षा करिअर मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी १० फेब्रुवारी



**दर्यापूर :** दर्यापूर येथील श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर येथे आनंदी शनिवार अंतर्गत दि. तीन फेब्रुवारीला विद्यार्थ्यांकरिता करियर विषयक मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते

या कार्यशाळेला स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक श्री धनंजय गुप्ता सर यांनी विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेतली. त्यांनी विद्यार्थ्यांना वर्ग १० वी नंतर व १२ वी नंतर विविध स्पर्धा परीक्षा याबद्दल माहिती दिली व त्या परीक्षेला असणारा अभ्यासक्रम याची माहिती दिली व परीक्षेमध्ये विचारणारे प्रश्न आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतले विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला यामधून विद्यार्थ्यांना दहावी व बारावीनंतर केंद्र सरकारच्या रेल्वे बोर्ड मध्ये असणाऱ्या विविध परीक्षा संदर्भात माहिती मिळाली. या कार्यशाळेला शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक विलास मुळे यांनी मार्गदर्शन केले या प्रसंगी जेष्ठ शिक्षक विनोद मेश्राम सर उपस्थित होते या कार्यशाळे चे आयोजन राहुल महाजन यांनी केले.

# आरोग्य विभागाच्या जाणिव जागृती शिबिरात महिलेचा मृत्यू

प्रतिनिधी १० फेब्रुवारी



**धारणी:** मेळघाटात सिकलसेल आजाराने थैमान घातले असून सध्या चिखलदरा तालुक्यात २०९ रुग्ण या आजाराने प्रत्यक्ष ग्रस्त आहेत तर त्याचे वाहक ३०८८ आहेत. चिखलदरा येथील ग्रामीण रुग्णालयात आरोग्य विभागाने सिकलसेल आजाराच्या रुग्णांसाठी आरोग्य शिबिर आयोजित केले होते. या शिबिरामध्ये चिखलदरा तालुक्यातील चिखली गावातील ४२ वर्षीय द्रोपदी सुरेश पटोलकर ही महिला गावातील नागरिक व आशा स्वयंसेविका यांच्यासोबत शिबिराचा लाभघेण्यासाठी आली होती.

मात्र, शिबिरामध्ये पोहोचताच अचानक या महिलेला रक्ताच्या उलट्या झाल्या व जागीच मृत्यू झाला. त्यामुळे चांगलीच खळबळ उडाली. या महिलेवर आरोग्य विभागामार्फत चार ते पाच

वर्षापासून सिकलसेल आजाराचे औषधोपचार सुरू होते, अशी माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. चार-पाच वर्षापासून सिकलसेल या महिलेला आजार होता. शुक्रवारी चिखलदरा येथे आयोजित शिबिरात महिलांसाठी व रुग्णांसाठी शासनाकडून ज्या योजना चालतात, याची माहिती देण्यात येणार होती. या योजनेचा लाभ व दिव्यांग शिबिर यासाठी या शिबिरात या महिलेला आणले होते. मात्र, आल्याबरोबर त्यांना रक्ताच्या उलट्या झाल्या व त्यांचा मृत्यू झाला. मागील तीन-चार वर्षापासून सिकलसेल आजाराचे औषध उपचार सुरू असल्याची माहिती आशा स्वयंसेविका जया खेडकर यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

# दाखल प्रकरणांवर तत्काळ कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करा- विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

## विभागीय लोकशाही दिनात दहा प्रकरणांवर सुनावणी



**अमरावती:** विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर विहीत कालमर्यादेत कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करावा. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, पुढच्या लोकशाही दिनाच्या अगोदरच शेवटचे निराकरण करुन प्रकरण नस्तीबध्द करण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना आज दिले. लोकशाही दिनात दाखल एकूण दहा प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज आज पार पडले. अपर आयुक्त संजय जाधव, उपायुक्त संतोष कवडे, उपायुक्त राजू फडके, यांच्यासह महसूल, पोलीस, महापालिका, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते. यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण दहा प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून दोन प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना श्रीमती सिंघल यांनी संबंधित विभागप्रमुखांना केल्या.

विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे एकूण १० प्रकरणांवर लोकशाही दिनात चर्चा करण्यात आली. ही प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यासाठी संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी, पडताळणी करुन सुस्पष्ट अंतीम अहवाल तत्काळ सादर करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यावेळी दिले. विभागीय महिला लोकशाही दिनांतर्गत एकही प्रकरण दाखल झाली नाही, अशी माहिती महिला व बालविकास विभागाव्दारे देण्यात आली.

यावेळी लोकशाही दिनासाठी अमरावती विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. मागील लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये. न्यायप्रविष्ट किंवा अर्धन्यायिक प्रकरणांसंदर्भात तत्काळ अहवाल सादर करण्यात यावा. लोकशाही दिनासाठी दाखल होणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना श्रीमती सिंघल यांनी यावेळी केल्या.

# भूमी अभिलेखचा तालुकास्तरीय जनसंवाद कार्यक्रम

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

## नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन

**अमरावती:** नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' राबवण्यात येत आहे. यासाठी 'तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सुधारीत कार्यक्रमानुसार २० फेब्रुवारीपासून अभियान राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमात नागरिकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक तक्रारी, विविध विकासकामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव आणि स्थानिक पातळीवरील महत्त्वाच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. या दिवशी तहसीलस्तरावर जिल्हा परिषद तसेच संबंधित तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसचिव आणि कृषी सहाय्यक यांची उपस्थिती राहणार आहे.

तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमासाठी समन्वयक अधिकारी प्रशासनाने तालुकानिहाय जबाबदारी सोपवली असून उपस्थितीत तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम घेण्यासाठी खालीलप्रमाणे घेण्यात आले आहेत. सकाळी १० ते २ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख अमरावती येथे दि. ०२ मार्च, २०२६ रोजी, दुपारी ३ ते ६ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख भातकुली येथे दि. ०२ मार्च, २०२६ रोजी, सकाळी १० ते १.३० वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख मोर्शी येथे दि. २० फेब्रुवारी, २०२६ रोजी, दुपारी ३ ते ६ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख वरूड येथे दि. २० फेब्रुवारी, २०२६ रोजी, सकाळी १० ते १.३० वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख चांदुर बाजार येथे दि. २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी, सकाळी १० ते १.३० वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख दर्यापूर येथे दि. २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी, दुपारी ३ ते ६ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख अंजनगाव येथे दि. २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी, सकाळी १२ ते ३ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख चिलखदरा येथे दि. २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी, दुपारी १२ ते ३ वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख धारणी येथे दि. ०६ मार्च, २०२६ रोजी कार्यक्रम घेण्यात यईल.

जिल्हा परिषद, तसेच संबंधित तालुक्यातील इतर सर्व विभागाचे अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसचिव, कृषी सहायक यांचे उपस्थितीत तालुक्यातील जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम आयोजित करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाचे महेशकुमार शिंदे यांनी केले आहे.

# जिल्ह्यात महारेशीम अभियानाचा शुभारंभ

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

## ८०० एकरवर रेशीम लागवडीचे उद्दिष्ट



**अमरावती:** जिल्हाधिकारी आशिष येरेकार यांच्या हस्ते आज 'महारेशीम अभियान २०२६'चा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी रेशीम रथाला हिरवी झेंडी दाखविली. तसेच रेशीम उद्योगाची माहिती जाणून घेतली.

सन २०२६-२७ या वर्षात जिल्ह्यात एकूण ८०० एकर क्षेत्रावर रेशीम शेती लागवडीचे उद्दीष्ट आहे. यात कृषि विभागातर्फे ३०० एकर, रेशीमतर्फे विभाग: २५० एकर, आणि जिल्हा परिषदेतर्फे २५० एकर रेशीम लागवड करण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी जून २०२६ मध्ये तुती लागवडीसाठी ४ फेब्रुवारी ते ५ मार्चपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. ही नोंदणी 'आपले सरकार' पोर्टलवरून ऑनलाईन पद्धतीने करून त्याची प्रत जिल्हा रेशीम कार्यालयात जमा करावी लागणार आहे. यासाठी प्रति एकर ५०० रुपये नोंदणी शुल्क आकारले जाणार आहे.

शेतकरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) अंतर्गत जॉब कार्डधारक असावा आणि त्याच्याकडे सिंचनाची सोय असावी. एका गावातून किमान पाच लाभार्थी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने सातबारा, ८-अ उतारा, चतु:सिमा नकाशा, आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मग्रारोहयो अंतर्गत या योजनेतून शेतकऱ्यांना तीन वर्षांसाठी मजुरी आणि साहित्यासाठी एकूण ४ लाख ३२ हजार २४० रुपये दिले जाणार आहे. सिल्क समग्र-२ योजनेतून जे शेतकरी अल्पभूधारक नाहीत, त्यांच्यासाठी ही योजना असून यात प्रवर्गांनुसार अनुदान दिले जाणार आहे. यात १ एकरसाठी ३ लाख ७५ हजार रुपये इमावसाठी ते ४ लाख ५० हजार रुपये अनुसूचित जाती, जमातीसाठी दिले जाणार आहे. २ एकरसाठी ५ लाख ६२ हजार ५०० रुपये इमावसाठी ते ६ लाख ७५ हजार रुपये अनुसूचित जाती, जमातीसाठी दिले जाणार अहो.

# उघड्या विद्युत तारांमुळे मुक्या पक्ष्यांचा बळी

## शिवाजी नगर, बनोसा स्टेट बँक रोडवरील विदयुत पोल ठरत आहे प्राणघातक

प्रतिनिधी १० फेब्रुवारी



**दर्यापूर:** शिवाजी नगर, बनोसा स्टेट बँक रोड येथे मालपाणी यांच्या घरासमोरील पथविद्युत पोल सध्या मुक्या पक्ष्यांसाठी मृत्यूचा सापळा ठरत आहे. या पोलवर असलेल्या घरगुती व मेन विद्युत केबल्स मोठ्या प्रमाणात उघड्या असून त्यामधून सतत विद्युत प्रवाह सुरू आहे.

या उघड्या तार्‍यांवर बसणारे विविध प्रजातींचे निरपराध, मुक पक्षी विद्युत धक्क्याने जागीच मृत्युमुखी पडत आहेत. रोज घडणारी ही घटना पाहून परिसरातील नागरिकांचे मन सुन्न होत आहे. निसर्गाचा समतोल राखणारे, पर्यावरणाचे खरे शिलेदार असलेले पक्षी अशा निष्काळजीपणामुळे आपले प्राण गमावत आहेत, ही बाब अत्यंत वेदनादायक आहे.

जर याकडे वेळेत लक्ष दिले गेले नाही, तर येत्या काळात 'आकाशात पक्षी दिसेनासे होतील' अशी भीषण परिस्थिती निर्माण होऊ शकते. ही केवळ पक्ष्यांची हानी नसून पर्यावरणाची आणि मानवतेचीही मोठी हानी आहे. मुक्या पक्ष्यांचे प्राण वाचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. परिसरातील नागरिक व पर्यावरणप्रेमींनी या समस्येकडे लक्ष वेधत, प्रशासनाने तातडीने कारवाई करावी अशी जोरदार मागणी केली आहे.

**विद्युत वितरण कंपनीस थेट विनंती**

महावितरण / संबंधित विद्युत वितरण कंपनीने या गंभीर विषयाची तात्काळ दखल घ्यावी. सदर विद्युत पोलवरील उघड्या केबल्स त्वरित सुरक्षित पद्धतीने दुरुस्त कराव्यात, इन्सुलेशन करावे व भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात.

# ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांचा दौरा

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**अमरावती:** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील हे मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी जिल्ह्याचा दौरा करणार आहेत.

दौऱ्यानुसार, मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयातील मिशनच्या कार्यालयात उपस्थित राहतील. दुपारी ३ वाजता तामसवाडी फाटा, ता. दर्यापूर येथे शिवछत्रपती शंकरपट कार्यक्रमास उपस्थित राहतील.

दुपारी ४.३० वाजता वडाळगव्हाण, ता. दर्यापूर येथे देवेश अशोक वडाळ यांचे शेतामध्ये कापूस काढणी यंत्राची पाहणी करतील. त्यानंतर सोईनुसार काटोलकडे प्रयाण करतील.

सिटी न्यूज सुपरफास्ट खामगाव

# मलकापूर येथील तालुका कृषी पर्यवेक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**खामगांव :** आधीच कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांच्या खिशावर डल्ला मारणाऱ्या अधिकाऱ्यांची खोड काही मोडताना दिसत नसल्याचे आज पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. शेतकऱ्यांच्या अनुदानाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी लाचेची मागणी करणाऱ्या मलकापूर येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी पर्यवेक्षक ईश्वर भागवत सावकारे (वय ४१ वर्षे) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून रंगेहात अटक केली. या कारवाईमुळे महसूल आणि कृषी विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे.

तक्रारदार शेतकऱ्याने कृषी यांत्रिकीकरण उप अभियान योजनेअंतर्गत कृषी विभागाच्या पूर्व संमतीने मळणी यंत्र खरेदी केले होते. या खरेदी केलेल्या यंत्राचे शासकीय अनुदान मिळवण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक होते. हे काम करुन देण्यासाठी कृषी पर्यवेक्षक ईश्वर सावकारे याने तक्रारदार शेतकऱ्याकडे पाच हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.

आपले हक्काचे अनुदान मिळवण्यासाठी लाच देणे मान्य नसल्याने, संबंधित शेतकऱ्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (बुलढाणा) यांच्याकडे धाव घेऊन रीतसर तक्रार केली होती. त्या अनुषंगाने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सहा फेब्रुवारी २०२६ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली. पडताळणी दरम्यान, सावकारे यांनी पाच हजार रुपयांची मागणी करून तडजोडीअंती चार हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले.

दरम्यान, आज ९ फेब्रुवारी २०२६ रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मलकापूर ते बोदवड रोडवर असलेल्या पिंपळगाव देवी फाट्यावरील राधास्वामी सत्संग परिसरात सापळा लावला आणि तक्रारदार शेतकऱ्याकडून चार हजार रुपयांची लाच स्वीकारताना सावकारे यास पंचांसमक्ष रंगेहात पकडले. या प्रकरणी आरोपी ईश्वर सावकारे यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**यांनी केली मोहीम फत्ते**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अपर पोलीस अधीक्षक देविदास घेवारे, आणि पोलीस उपअधीक्षक (एसीबी, बुलढाणा) भागोजी चोरमले यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक रमेश पवार, विलास गुसिंगे आणि लक्ष्मीकांत इंगळे, गजानन गाडे, रंजीत व्यवहारे, शैलेश सोनवणे यांनी सदर मोहीम फत्ते केली.

सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# हिदायतउल्ला पटेल खून प्रकरणात संशयितांचा अटकपूर्व जामीन फेटाळला

**अकोट :** काँग्रेस नेते हिदायतउल्ला खाँ पटेल यांच्या खून प्रकरणातील संशयित आरोपी ॲड. फाजील खाँ आसीफ खाँ पटेल व फारुख खाँ आसिफ खाँ पटेल यांचा अटकपूर्व जामीन अर्ज अकोट सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. वि. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी हा निर्णय दिला. सरकार पक्षातर्फे गुन्हा गंभीर स्वरूपाचा असून आरोपी घटनेपासून फरार आहेत, तसेच मुख्य आरोपीला गुन्ह्यास प्रवृत्त केल्याचा संशय असल्याने तपास सुरू असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. प्रकरणाचा तपास अद्याप अपूर्ण असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ६ जानेवारी २०२६ रोजी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, मोहाळा येथील मशीद परिसरात नमाजनंतर हिदायतउल्ला पटेल यांच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला होता. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र ७ जानेवारी रोजी त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## धारदार चाकू हल्ल्याच्या आरोपीची अवघ्या २४ तासांत जामिनावर सुटका

**मूर्तिजापूर:** मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत एका युवकावर धारदार चाकूने प्राणघातक हल्ला करणाऱ्या आरोपीस तब्बल २ हजार ९०० किलोमीटरचा प्रवास करून पुण्यातून अटक करण्यात आली. मात्र, या कारवाईनंतर अवघ्या एकाच दिवसात आरोपीची जामिनावर सुटका झाल्याने पोलिसांच्या मेहनतीवर पाणी फिरल्याची तीव्र चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

सदर घटनेत आरोपीने युवकावर जीवघेणा हल्ला करून परिसरात दहशत निर्माण केली होती. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे पुण्यात सापळा रचत आरोपीला अटक केली. या कारवाईसाठी पोलिसांनी २,हजार ९०० किलोमीटरचा प्रवास, वेळ, मनुष्यबळ आणि शासकीय खर्च केला.

मात्र, आरोपीला न्यायालयात हजर केल्यानंतर अवघ्या २४ तासांत जामिन मंजूर झाल्याने संपूर्ण तपास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गंभीर स्वरूपाचा गुन्हा असूनही आरोपीची इतक्या लवकर सुटका झाल्याने पीडित युवक व त्याचे कुटुंबीय असुरक्षिततेच्या भीतीत आहेत.

## प्रशांत जामदारची अकाली एक्झिट

**अकोला:** प्रख्यात रंगकर्मी, कवी, दिग्दर्शक व अभिनेता



प्रशांत शांतारामजी जामदार यांचे ९ फेब्रुवारी रोजी दीर्घ आजारामुळे निधन झाले. युवा कलावंताने अकाली एक्झिट घेतल्यामुळे अकोल्याचे सांस्कृतिक क्षेत्र हळहळले. प्रशांत जामदार अकोल्यातील हरहुन्नरी कलावंत. नाटक, अभिनय प्रांतात रमायचा. नाट्य क्षेत्रात प्रयोग करण्याची त्याला आवड होती. परंतु आजारपणामुळे एव्हाना मर्यादा आल्या होत्या. आणि अजून खूप काही करायचे राहिले ही भावना मागे ठेवून प्रशांत जामदार काळाच्या पडद्याआड गेला. सोमवारी गुलजारपुरा मुक्तीधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. नाट्य, सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक जण उपस्थित होते.

# पानेटला श्री संत ब्रम्हचारी महाराज पुण्यतिथी सोहळा

### ◆ महाशिवरात्री निमित्त अखंड हरिनाम सप्ताह, यात्रा महोत्सव

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**अकोट:** चोहोट्टा बाजार परिसरातील पिलकवाडी नखेगाव ग्रामपंचायत अंतर्गत पूर्णा नदीच्या तिरावर वसलेले शिवभक्तांचे ग्राम आराध्य दैवत श्री मारुती व ब्रह्मचारी महाराज तीर्थक्षेत्र संस्थानात श्री संत ब्रह्मचारी महाराज पुण्यतिथी सोहळा व महाशिवरात्री उत्सवानिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व यात्रा महोत्सवाचे महाशिवरात्रीला आयोजन केले आहे.

प्रारंभ शनिवारी तर सांगता १६ रोजी होईल. उत्सवातील कार्यक्रमाची रूपरेषा शनिवार ७ ला सकाळी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त पालखी नगर प्रदक्षिणा प्रस्थान होऊन तीर्थक्षेत्र पाणी पाण्यात येथे महाराजांची समाधी समोर श्री ह भ प सोपान महाराज लोखंडे शिरसोली यांचे दुपारी १२ ते २ हरिकीर्तन होईल, सोमवार १६ ला सकाळी ती पर्यंत श्री ह भ प रामकृष्ण महाराज यांचे काल्याचे किर्तन होईल व दुपारी १२ ते २ पर्यंत पालखी सोहळा होईल आणि दुपारी २ ते ५ महाप्रसाद वाटप होईल, दैनंदिन कार्यक्रम पहाटे ५ ते ६ काकडा सकाळी ९ ते ११ पादुका अभिषेक व दुपारी ३ ते ५ हरिकीर्तन सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ राहील, सप्ताह मधील नामवंत कीर्तनकार ह भ प सोपान महाराज लोखंडे सिरसोली दि.७, ह भ प निवृत्ती महाराज मानकर सोनखेड भुईखेड दि.८, हभप मोहन महाराज मेतकर जैनपूर पिंपळोद दि.९ , ह भ प माणिकराव महाराज भगत कोकलवाडी दि.१०, ह भ प गजानन महाराज पवित्रकार काटेश्वर, दि.११, ह भ प शिवाजी महाराज अमृतकर अकोला दि.१२, ह भ प आत्माराम महाराज वाकोडे नौराट वैराट दि.१३, ह भ प विश्वंभर महाराज अढाऊ शिव पुराण व भागवत कथाकार काकणवाडा दि.१४, ह भ प राजेंद्र महाराज वक्तटे पाळोदी दि.१५, ह भ प रामकृष्ण महाराज अढाऊ काकण वाडा यांची काल्याचे किर्तन होईल दि.१६, या अखंड हरिनाम





सप्ताह मधील अन्नदाते शनिवार ७ श्री ब्रह्मचारी महाराज संस्थान पानेट, रविवार ८ प्रल्हाद मते , सोमवार ९ ज्ञानेश्वर मोडक , मंगळवार १० रामेश्वर मोडक, बुधवार ११ नागोराव टापरे, गुरुवार १२ शहादेव वाघमारे, शुक्रवार १३ अशोक मोडक , शनिवार १४ बापूराव मोडक, केशव धारपवार, रविवार १५ मनोहर बघे, ज्ञानेश्वर महल्ले , सोमवार १६ प्रवीण मुंडाले ,संपूर्ण कार्यक्रमाचा महाप्रसाद दुपारी २ ते ५ पर्यंत राहील, या उत्सवात सेवा अर्पण करणारी टाळकरी व सेवाधारी मंडळी पिलकवाडी, नखेगाव, गोपालखेड, टाकळी बु. नादखेड, सांगवी, हनवाडी, करोडी, किनखेड, वैराट वैराट ,टाकळी खुर्द, चोहोट्टा बाजार संपूर्ण पंचक्रोशीतील भाविक भक्त या अखंड हरिनाम सप्ताह यात्रा महोत्सवाला तन-मन धनाने उपस्थिती लावून महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक श्री मारुती व ब्रह्मचारी महाराज संस्थान तीर्थक्षेत्र पानेट यांनी आवाहन केले आहे.

# टाळ मृदुंगाच्या गजरात दुमदुमली वरूर जऊळका संतनगरी

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**अकोट:** संतनगरी वरुर जऊळका येथे योग योगेश्वर संस्थान च्या माध्यमातून समर्थ सद्गुरु गजानन महाराज यांच्या प्रकट दिनाच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते. त्यामध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण, शिव महापुराण कथा आणि महाराष्ट्रातील दिग्गज कीर्तनकार महाराजांचे कीर्तन आयोजित केले होते, या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवून पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घेतला.

प्रकट दिनाच्या दिवसाला सकाळी श्रींच्या मूर्तीचा अभिषेक करण्यात आला आणि अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप ह. भ. प. गणेश महाराज शेटे यांच्या कार्याच्या कीर्तने पार पडला. बाहेरगाहून आलेल्या महाराज मंडळींचा सत्कार राजू नागमते, कुलदीप वसू, धीरज शिरसाठ, विनायक शेटे , संजू शेटे, राजू शेटे, नाना दांदळे, अंबादास आवारे यांच्या हस्ते करण्यात आला.



महाप्रसादाकरिता कुलदीप वसू, बंडूभाऊ शिरसाट, संदीप रामेकर, गणेश पांडव , ज्ञानेश्वर ठाकरे यांचे विशेष सहकार्य लाभले

यावेळी बाहेर गावच्या भाविकांना कीर्तन श्रवणाचा लाभ घेता यावा याकरता ट्रॅक्टरची व्यवस्था सुनील राजगुरू विटाळी, अनिल हिंगणकर कालवाडी, दत्ता ओळंबे खापरवाडी, कुलदीप वसू लोतखेड, गणेश कराड दिनोडा,दिलीप झांबरे रोहनखेड यांच्या वतीने करण्यात आली होती प्रकट दिनाच्या दिवसाला श्रींच्या दर्शनाला व महाप्रसादाचा लाभ घेण्याच्या करता हजारो भक्ती गण योग योगेश्वर संस्थान मध्ये जमले होते.संत नगरी वरुर जऊळका येथील ग्रामस्थांनी बाहेर जाऊन दर्शनाला आलेल्या सर्व भाविकांचे येथे चे स्वागत करून त्यांचे भरपूर सेवा केली, आणि सायंकाळी श्रींच्या मुखवट्यासह ग्रंथ दिंडी सोहळा काढण्यात आला यामध्ये गावकरी मंडळींनी आपल्या घराच्या समोर सुशोभीकरण करून सर्व वारकऱ्यांचे मनोभावे स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमाला दिनोडा,लोतखेड,मरोडा ,कवसा ,रोहनखेड, खापरवाडी खुर्द ,खापरवाडी बु. कालवाडी, विटाळी, सावरगाव येथील टाळकरी मंडळींची विशेष उपस्थिती उपस्थिती लाभली वरील सर्व कार्यक्रम संस्थांचे विश्वस्त रतन वानखडे, किसन वरईकर, भास्कर म. बहाड, विलास म. कराड ,प्रवीण शेटे यांच्या नियोजनात पार पडले अशी माहिती संस्थांचे अध्यक्ष ह.भ. प. श्री गणेश महाराज शेटे यांनी दिली.

# तक्रारकर्त्या महिला शेतकऱ्याला मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांचा अजब सल्ला

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**मूर्तिजापूर :** कंझरा येथील एका महिला शेतकऱ्याला शेजारील शेतमालकाकडून होत असलेल्या अन्यायाबाबत तक्रार दाखल केल्यानंतर मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांकडून धक्कादायक व अजब सल्ला देण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

महिला शेतकऱ्याच्या स्वतःच्या शेतातील बोरवेलवर बाजूच्या शेतमालकाने अनधिकृत ताबा घेत पाणी वापरण्यास मनाई केल्याचा आरोप आहे. याबाबत श्रीमती सरिता वाशीमकर नामक महिला शेतकऱ्याने मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात बबनराव देशमुख व त्यांच्या मुला विरुद्ध तक्रार दाखल केली. मात्र, तक्रारीवर ठोस कारवाई करण्याऐवजी मूर्तिजापूर ग्रामीण पोलिस स्टेशन च्या कंझरा येथील बिट जमादार दिपक कानडे यांनी दिलेला सल्ला ऐकून तक्रारकर्ती चक्रावून गेली आहे.

या महायशायने संबंधित महिलेला, 'तुम्ही सुद्धा तुमच्याच बोरवेलचे पाणी वापरू नका आणि त्यालाही वापरू देऊ नका. तुम्ही थेट कोर्टात जा,' असा अजब सल्ला दिल्याचे तक्रारकर्त्या महिला शेतकऱ्याचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांच्या पाण्याच्या प्रश्नावर गंभीर भूमिका घेणे अपेक्षित असताना, पोलिसांकडून अशा प्रकारचा सल्ला देण्यात आल्याने कायद्याच्या अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विशेषतः महिला शेतकरी असताना संरक्षण देण्याऐवजी न्यायालयात जाण्याचा सल्ला देणे म्हणजे जबाबदारी झटकण्याचा प्रकार असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

दरम्यान, संबंधित शेजारी शेतमालकाची गुंड प्रवृत्ती असल्याचा आरोप असून त्यामुळे महिला शेतकरी भीतीच्या वातावरणात शेती करीत आहे. पोलिसांकडून तात्काळ हस्तक्षेप होऊन बोरवेलवरील अनधिकृत ताबा हटवावा, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.

# वाडेगावमध्ये पिसाळलेल्या श्वानाने २४ जणांना घेतला चावा

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**वाडेगाव :** वाडेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीत ९ फेब्रुवारी रोजी पिसाळलेल्या श्वानाने गावात धुमाकूळ घालत महिलांसह २४ ग्रामस्थांना चावा घेतल्याची घटना घडली. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिक घराबाहेर पडण्यास घाबरत आहेत.

पिसाळलेल्या श्वानाने महिला, पुरुष व मुलींना चावा घेत जखमी केले. त्यामुळे काही भागातील महिला घराबाहेर जाण्यासही धजावत नाही. जखमींपैकी ५ ते ६ जणांनी डॉ. शिवा करंजकर यांच्या खासगी दवाखान्यात उपचार घेतले, तर उर्वरित रुग्णांवर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत करवते यांनी दिली.

जखमींमध्ये वंदना सरप(३५), बबिता महाले(४०), चंदा धनोकार (५०), पर्वता नेमाडे(७०), सुनीता आठे (३५), हर्षा फाळके (४६), कमला इंगळे (७२), नवल सरप (१६), ज्ञानेश्वर मसने(४२), प्रिया डोंगरे (३०), शेषराव अवचार (७०), मुलचंद काकडे (६१), अरुण चिंचोलकर (४५), अरविंद अग्रथे(२८), सुरेश भटकर(६५), हरिश्चंद्र शिरसाट (६५), दानिश काजी बेग (२१), कुणाल खंडारे (२२), ज्ञानेश्वर लहाने(२२), भक्ती वाडकर(१६), शेख सईद(३६), तुषार भटकर (२४), बेबीबाई राजघडे (५५), गजानन लोखंडे (४८), प्रकाश वासुदेव ठोंबरे (६५), सुमती भुस्कुटे आदींचा समावेश आहे. संबंधित विभागाने तातडीने कारवाई करून पिसाळलेल्या श्वानाचा बंदोबस्त करावा, जेणेकरून ग्रामस्थांची भीती दूर होईल, अशी मागणी सुनील घाटोळ ग्राम पंचायत सदस्य, सुनील मानकर , खैरुन्निसा शेख चांद , ग्राम पंचायत सदस्या ,अनिल बारबुदे, दानिश काजी, सचिन धनोकर, संदीप ठोंबरे आदींनी केली आहे. ग्राम पंचायत प्रशासनाने गावात ग्राम पंचायत सरपंच मेजर मंगेश तायडे, ग्रामपंचायत अविकारी योगेश कापकर व सर्व सदस्य सदस्या यांनी गावात ग्राम पंचायत कर्मचारी बाळु घाटोळ यांच्या मार्फत दवंडी दिली आहे.

# रंगमंचावर 'संभाजी राजे' साकारणाऱ्या कलावंतांचा छावा संघटनेकडून सत्कार

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**अकोला:** शिवपुत्र स्वराज्य रक्षक संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित महानाट्य अतिशय प्रभावीपणे सादर करणाऱ्या तुळसाबाई कावल विद्यालय पातुर येथील विद्यार्थ्यांचा छावा संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला.

पातुर येथे तुळसाबाई कावल विद्यालयाचे प्रांगणात शेकडो विद्यार्थ्यांचे उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बेरार एज्युकेशन सोसायटी पातूरचे व्यवस्थापक विजयसिंह गहिलोत होते. तर प्रमुख अतिथी म्हणून छावा संघटनेचे जिल्हाप्रमुख शंकरराव



वाकोडे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, रितेश मिर्झापुरे, स्नेह प्रभादेवी गहिलोत, प्राचार्य अंशुमन सिंह गहिलोत, छावाचे जिल्हा संघटक निवृत्ती वानखडे, उपाध्यक्ष गोपाल पाटकर, बाळासाहेब लाहोळे, डॉ. संतोष भिसे, अनिरुद्ध भाजीपाले, श्रीनाथ पहेलवान, देवेंद्र मोहोकार, तालुकाप्रमुख सोनु गिरी उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनी सादर करण्यात आलेल्या या संभाजी महानाट्यातील सर्वच कलावंतांनी दमदार भूमिका करून साक्षात संभाजी युग प्रेक्षकांसमोर सादर केले. छावा संघटनेने या महानाट्याची दखल घेऊन या नाटकातील विद्यार्थी कलावंतांचा कौतुक सोहळा घडवून आणला. या नाटकातील संभाजी राजांची भूमिका साकारणाऱ्या उज्ज्वल कांबळे, अभिजीत तायडे, कवी कलश साकारणाऱ्या अमित खंडारे, येसूबाईच्या भूमिकेतील स्वरा पवार, बहिर्जी नाईकाचे भूमिकेतील हर्षल भुसांडे व कलावंतांचा स्कूल बॅग देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी प्रदीप खाडे, निवृत्ती वानखडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास मदर इंडिया कॉन्व्हेंट पातुर चे प्राचार्य महेंद्र खंडारे, उप प्राचार्य एस. बी. चव्हाण, उपमुख्याध्यापिका आर. एस. ढेंगे, पर्यवेक्षिका पी. एम. कारस्कर, पर्यवेक्षक एस. आर. मुखाडे, सहाय्यक शिक्षक अर्जुन गहिलोत यांचे सह शाळेतील शिक्षक व शेकडो विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन सुभाष इंगळे यांनी केले.

# वैष्णवांची मांदियाळी अन् सेवा उपक्रमांनी श्री संत वासुदेव महाराजांचा १०९ वा जयंती महोत्सव

### ◆ सुश्राव्य ज्ञानेश्वरी भावकथा, माऊलींच्या अश्वांचे रिंगण व दिंड्यांचा महासोहळा

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**अकोट:** सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज यांचा १०९ वा जयंती महोत्सव १३ ते २० फेब्रुवारी दरम्यान संतनगरी अकोट मध्ये होत आहे. यानिमित्ताने व श्री संस्था स्थापनेच्या रौप्य महोत्सवी २५ वर्ष निमित्ताने पुण्यभूमी श्री क्षेत्र श्रद्धासागर, आकोट येथे विविध धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक, आरोग्य, कायदेविषयक सेवा उपक्रम सुनियोजित आहेत. या श्रद्धा, भक्ती, ज्ञान, प्रबोधन महोत्सवात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ,श्री संत वासुदेव महाराज चरित्र ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह पार पडणार आहे. व्यासपीठ नेतृत्व ह भ प अंबादास महाराज मानकर हे करीत आहेत. ज्ञानदानाबरोबरच दानशूर अन्नदात्यांकडून हजारो भाविकांना अन्नदानाचे सत्रसुध्दा सकाळ व सायंकाळला नियोजित आहे.

कीर्तन महोत्सव सप्ताहामध्ये रात्री ८ ते १० वा. कीर्तन महोत्सवात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार सर्व .ह.भ.प. ज्ञानेशप्रसाद म. पाटील आकोट, ज्ञानेश्वर म. जळकेकर जळगाव खान्देश, नरहरी म. सांगळे





**श्री ज्ञानेश्वरदास विरचित ग्रंथांवर निरूपण**

श्री संत वासुदेव महाराज उपाख्य श्री ज्ञानेश्वरदास यांनी रचलेल्या ग्रंथसंपदेमधील ज्ञानामृताचा लाभ दररोज दु. ३ ते ४ या वेळेत सर्व ह.भ.प. सुभाष महाराज बानेरकर, पुरुषोत्तम महाराज तळोकार, उमेश महाराज मोहोकार, प्रकाश महाराज नेवारे, राम महाराज गाढे, पांडुरंग महाराज लाजुरकर, वासुदेव महाराज महल्ले यांच्या निरुपणामधून अनुक्रमे होणार आहे.

**सुश्राव्य ज्ञानेश्वरी भावकथा निरूपण**

दुपारच्या सत्रामध्ये ४ ते ६ या वेळेत ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक व ज्ञानेश्वरी कंठस्थ असणारे ह भ प नरहरी महाराज सांगळे, श्री क्षेत्र आळंदी देवाची यांच्या सुश्राव्य वाणीतून श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी भावकथा निरूपण भक्तांकरिता ज्ञानामृताची मेजवानी ठरेल.

श्री क्षेत्र आळंदी देवाची, संदिपान म. शिंदे श्री क्षेत्र आळंदी देवाची, जगन्नाथ म. पाटील भिवंडी, अनिल म. पाटील श्री क्षेत्र बार्शी, ज्ञानेश्वर माऊली शिंदे श्री क्षेत्र आळंदी देवाची यांची अनुक्रमे कीर्तन सेवा संपन्न होईल. ह.भ.प. गोपाळ म.उरळकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. भव्य आरोग्य शिबिर रविवार १५ रोजी भव्य नि:शुल्क आरोग्य तपासणी व रोग निदान शिबीर आयोजित केले आहे. यामध्ये सुप्रसिद्ध शल्य चिकित्सक सर्जन, हृदयरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, ऑर्थो सर्जन, फिजिशियन, त्वचारोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ, पोट विकार व लिव्हर तज्ञ, आदी विद्वान डॉक्टर मंडळी सेवा देणार आहेत. तसेच, गरजू रुग्णांना पुढील उपचारादरम्यान विशेष सवलत देण्यात येईल. या निशुल्क शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा. ङभव्य दिव्य रिंगण सोहळा-ङ विश्वमाऊली श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील श्रीमंत शितोळे सरकार-अंकली, कर्नाटक येथील श्री माऊलींचे अश्व यांचा भव्य-दिव्य रिंगण सोहळा २० फेब्रुवारीला श्रींच्या पालखी सोहळ्यामध्ये होईल. यामध्ये दोन उभे रिंगण व एक गोल रिंगण पार पडतील.ङमहाराष्ट्रातील असंख्य दिंड्यांचा महासोहळा-ङ

श्रींच्या जन्मोत्सवानिमित्त महाराष्ट्रातील प्रख्यात दिंड्यांचा महासोहळा सुनियोजित असून यांमधील निवडक दिंड्यांना टाळ, वीणा, मृदंग, इत्यादी भजनी साहित्य देण्यात येईल. भव्य दिंडी सोहळा शहरातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करेल. दिंडी प्रमुखांनी संस्था कार्यालयात नोंदणी करणे आवश्यक राहील.

**श्रींचा जन्मोत्सव सोहळा**

फाल्गुन शुद्ध तृतीया या गुरुवर्य श्री संत वासुदेवजी महाराज यांच्या जन्मतिथीला अर्थात २० फेब्रुवारी रोजी गुरुवर्यांच्या निवासस्थानावरून सकाळी ७:३० वा. भव्य दिंडी सोहळा सुरू होऊन संतनगरी आकोटमध्ये संपन्न होणार आहे. तद्नंतर रिंगण सोहळा, गुरुवंदना, महाआरती, आदींनी श्रींचा जन्मोत्सव सोहळा व भव्य महाप्रसाद कार्यक्रम संपन्न होणार आहे.

# नगरपरिषद सभापतीचे शेतकरी हितासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**हिवरखेड:** हिवरखेड नगरपरिषद मधील स्वच्छता वैद्यक व आरोग्य सभापती वंदना राजेश वानखडे यांनी ९ फेब्रुवारी रोजी अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यासंदर्भात निवेदन दिले.

गेल्या अनेक महिन्यापासून महाडीबीटी पोर्टल पूर्वसंमतीचे साईट तसेच किसान सन्मान निधी व भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना साईट बंद असल्याने शेतकरी अडचणीत आला आहे ,

तसेच ड्रीप व तुषार सिंचन व इतर सर्व अनुदान अप्राप्त आहेत . त्यामुळे शेतकरी आणखी हवालदिल झाले,

तरी तात्काळ या सर्व योजना सुरळीत सुरू कराव्यात व यामध्ये निधी उपलब्ध करून द्यावा तसेच महाराष्ट्र शासनाने खरीप २०२५ चा पिक विमा मंजूर केला असून विमा कंपन्या याकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे अद्याप पर्यंत खरीप २०२५ चा विमा शेतकऱ्यांना मिळाला नाही,

व अतिवृष्टीचे अनुदान सुद्धा अजुनही मिळाले नाही,हिवरखेड सह तेल्हारा तालुक्यातील अनेक शेतकरी संध्या वंचित आहेत,या सर्व गंभीर बाबीची तातडीने या संबंधितांनी अधिकृतपणे दखल घ्यावी , याबाबतचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यासह जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी अकोला यांना देण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी हिवरखेड नगरपरिषदचे सभापती नेहमी अग्रेसर राहतात.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-Tender Notice**

Super scribed & sealed offer in Two Bid System are invited from Reputed Firms / Contractors / Company for **T-13 & T-14 - Empanelment** of New & Regular Agencies for Repairing of capacities up to 100 KVA failed Distribution Transformers, **T-15 & T-16 - Empanelment** of New & Regular Agencies for repairing of capacities above 100 KVA failed distribution transformer under Akola Circle. The e-Tender details / documents for above tender are available on website **www.etender.mahadiscom.in** The cost of e-tender is **Rs. 1180/-** including GST (each tender). Submit the tender duly filled in on or before **27.02.2026** up to **17.30 Hrs.** The e-Tender documents can be downloaded from aforesaid website from **09.02.2026.** If any changes in the e-tender, prospective bidders are requested to regularly check the website. Contact No. **78757633337.**

**PRO No. 26/2026**

**Superintending Engineer, O&M Circle, Akola**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# बारावी परीक्षा : केंद्रावर 'सीसीटीव्ही वॉच', सहा भरारी पथकांची निर्मिती

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**यवतमाळ** : जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने आजपासून बारावीच्या परीक्षेला सुरुवात होत आहे. कॉपीमुक्त व पारदर्शक वातावरणात परीक्षा पार पडाव्यात, यासाठी प्रशासनाने कडक उपाययोजना केल्या असून, यंदा परीक्षा केंद्रांवर 'सीसीटीव्ही वॉच'सह भरारी पथकांचा विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेसाठी एकूण १८ कस्टडी (पर्यवेक्षक) केंद्रे व १२७ परीक्षा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये तब्बल ३५ हजार ३५२ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. तर दहावीची परीक्षा १५६ परीक्षा केंद्रांवर होणार असून, ३८ हजार ७६४ विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार आहेत.



परीक्षा केंद्रावर रोल नंबर बघताना विद्यार्थी

परीक्षेदरम्यान गैरप्रकार रोखण्यासाठी शिक्षण विभागाने सहा भरारी पथकांची निर्मिती केली आहे. ही पथके अचानक तपासणी करणार असून, तालुका स्तरावर महसूल व ग्रामविकास विभागाची स्वतंत्र पथके कार्यरत असतील. प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथक तैनात करण्यात आले असून, त्यात तलाठी व ग्रामसेवकांचा समावेश आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे प्रत्येक परीक्षा केंद्रातील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. गेल्या वर्षी जिल्ह्यात १८ उपद्रवी परीक्षा केंद्रे होती.

यंदाही अशा केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दक्षता घेतली जात आहे.

> ■ जिल्हाधिकारी विकास मीना व पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा काळात पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला आहे. परीक्षा शांततेत व निर्भय वातावरणात पार पडाव्यात, यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी किशोर पागोरे व उपशिक्षणाधिकारी योगेश डाफ यांनी दिली.

# शक्तीपीठ महामार्गाच्या मोजणीला शेतकऱ्यांचा विरोध

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**उमरखेड** : वर्धा ते सिंधुदुर्ग 'शक्तीपीठ' महामार्गाच्या प्रस्तावित मार्गावर उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला. सोमवारी (दि. ९) बेलखेड आणि आमला शिवारात महामार्गासाठी मोजणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी रोखून धरले, त्यामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

शेतकऱ्यांच्या विरोधामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोजणी करणे शक्य झाले नाही. यावर पोलिसांनी हस्तक्षेप करून आंदोलक शेतकऱ्यांना ताब्यात घेतले. शेतकऱ्यांनी या महामार्गामुळे त्यांच्या शेतजमिनीचे नुकसान होईल आणि त्यांना भूमीहीन होण्याची भीती असल्याने त्यांनी प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या विरोधात पोलिसांनी जोरदार कारवाई केली, तर शेतकऱ्यांनी तातडीने न्यायालयात जाऊन या प्रकल्पाच्या विरोधात न्याय मिळवण्याचा इशारा दिला आहे.

महामार्गाच्या मोजणीसाठी आलेले अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांच्या विरोधाला सामोरे गेले, तसेच पोलिसांनी त्यांना धमकावून मोजणी करण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर शेतकऱ्यांना पोलीस व्हॅनमध्ये बसवून उपविभागीय कार्यालयात नेले आणि त्याठिकाणी उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्या समोर आपली भूमिका स्पष्ट केली.

शेतकऱ्यांनी सांगितले की, 'शक्तीपीठ महामार्गामुळे आम्हाला जमिनीचे नुकसान होईल आणि आमचा उदरनिर्वाह कमी होईल. सरकारने रेडी रेटनर प्रमाणे मदत देणारी असली तरी ती आम्हाला अपुरी आहे. आम्ही या महामार्गासाठी आमच्या जमिनी देणार नाही.'

उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी यावर सांगितले की, 'शासनाचा कायदेशीर अधिकार आहे आणि तुम्ही विरोध करु नका. न्यायालयात जाऊन तुम्ही दाद मागू शकता.' त्यावर शेतकऱ्यांनी स्पष्ट केले की, 'तुम्ही काहीही करा, आम्ही आमच्या जमिनी देणार नाही.'

या प्रकरणाची अधिक माहिती अशी आहे की, ऑगस्ट महिन्यात भूमी संपादनासाठी मोजणी करण्यात येणार होती, परंतु शेतकऱ्यांनी त्याला विरोध केला आणि ते थांबवण्यात आले. तीन दिवसांपूर्वी शेतकऱ्यांना नोटिसा दिल्या गेल्या, पण त्यांचा विरोध कायम राहिला आहे.शेतकऱ्यांच्या एकजुटीने प्रशासनाच्या विरोधात ठाम भूमिका घेतली असून, त्यांच्या संघर्षाची वादा न्यायालयात होण्याची शक्यता आहे.

जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांना शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्याबाबत निवेदन देण्यात आले.

# निसर्गरम्य प्रयासवनात विद्यार्थ्यांनी रेखाटली निसर्ग चित्र

## रंगछटांमधून विद्यार्थ्यांनी दिला निसर्ग रक्षणाचा संदेश

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**यवतमाळ** : सामाजिक वनीकरण विभागामार्फत निसर्ग संवर्धन, वृक्षारोपण आणि पर्यावरण जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांकरिता चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली.

निसर्गरम्य प्रयासवन येथे आयोजित या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व, वनीकरण, प्रदूषण नियंत्रण आणि निसर्गाचे संतुलन राखण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. 'पर्यावरण संरक्षण', 'वृक्ष हेच जीवन', 'पाणी अडवा पाणी जिरवा', 'हरित महाराष्ट्र' अशा विषयांवर आधारित चित्र विद्यार्थ्यांनी काढली. या स्पर्धेत जिल्हा परिषद, नगरपरिषद व खाजगी शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले. इयत्ता 1 ते 5 आणि इयत्ता 6 ते 9 अशा दोन गटात झालेल्या स्पर्धेत 300 हून अधिक विद्यार्थी / विद्यार्थिनी सहभागी झाले.



यावेळी सामाजिक वनीकरण विभागातील विभागीय वन अधिकारी प्राणिता पारधी, सहाय्यक वनसंरक्षक प्रिया गुल्हाने तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी शंकर मडावी व त्यांचे अधिनस्त उपस्थित वनपाल, वनरक्षक व इतर वनपरिक्षेत्र अधिकारी उपस्थित होते. तसेच प्रयास वनचे अध्यक्ष डॉ. विजय कावलकर आणि त्यांचे सहकारी या उपक्रमात सहभागी होते.

# पत्नीचा निर्घृण खून, आईवरही हल्ला : आरोपीस जन्मठेप

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**यवतमाळ** : पत्नीचा संशयातून निर्घृण खून करून आईवरही कुऱ्हाडीने हल्ला करणाऱ्या आरोपीस न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शेखर सी. मुनघाटे यांनी हा निकाल दिला. पीडित कुटुंबाला अखेर सात वर्षांनंतर न्याय मिळाला आहे.

विनोद बाबाराव कानबाले (वय ३५, रा. पिंपळगाव काळे, ता. नेर) असे शिक्षा ठोठावलेल्या आरोपीचे नाव आहे. नेर पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक ९५२/२०१७ नुसार आरोपी विनोद बाबाराव कानबाले (वय ३५, रा. पिंपळगाव काळे, ता. नेर) याने १२ एप्रिल २०१७ रोजी पत्नी वनिता हिचा कुऱ्हाडीने वार करून खून केला होता. घटनेच्या वेळी वनिता ही तिच्या लहान मुलगी श्रावणी हिला दूध पाजत होती. पत्नी आईकडे आपल्याबद्दल तक्रार करीत असल्याच्या संशयातून आरोपीने मानेवर कुऱ्हाडीचे वार केले. हल्ला थांबविण्यासाठी मध्ये पडलेल्या आरोपीच्या आई सुनिता कानबाले यांच्या डाव्या मनगटावरही वार होऊन त्या गंभीर जखमी झाल्या. या घटनेत वनिता यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी जखमी आईने नेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तपास अधिकारी एपीआय अजय एच. भुसारी यांनी तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकारी पक्षाच्या वतीने एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून आरोपीची आई व मुलगी, वैद्यकीय अधिकारी तसेच इतर साक्षीदारांचा समावेश होता. परिस्थितीजन्य पुरावे व साक्षीदारांचे जबाब न्यायालयाने ग्राह्य धरले. न्यायालयाने आरोपीस भा.दं.वि. कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व ५०० रुपये दंड, दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावास, तसेच कलम ३२४ अंतर्गत सहा महिने कारावास व २०० रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली. सर्व शिक्षा एकत्र भोगावयाच्या आहेत. सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील मंगेश एस. गंगलवार यांनी युक्तिवाद केला. पैरवी अधिकारी महेंद्र चरणदास भौवते यांनी तपासात मोलाची भूमिका बजावली.

# तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**उमरखेड** : सर्वाधिक शेतकरी आत्महत्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या यवतमाळ जिल्ह्यात ही दुर्दैवी मालिका थांबण्याचे नाव घेत नसून, उमरखेड तालुक्यात नापिकी व अतिवृष्टीने हैराण झालेल्या तरुण शेतकऱ्याने कीटकनाशक प्राशन करून जीवनयात्रा संपविल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.

मारोती सखाराम रनमले (वय २८ रा. निंगनूर अनंतवाडी) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. मारोती रनमले यांच्याकडे गट क्रमांक १ व सर्व्हे क्रमांक ९३९/१ मध्ये सुमारे १.६० आर शेती होती. मागील काळात झालेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण शेती खरडून निघाली, तर उर्वरित पिके पाण्याखाली गेली. पीक हातचे गेले, कर्जाचा डोंगर आणि उत्पन्नाचे कोणतेही साधन शिल्लक न राहिल्याने ते नैराश्यात होते. अतिवृष्टी व निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतीतील उभे पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याने ते गेल्या काही दिवसांपासून तीव्र मानसिक तणावात होते. अखेर मंगळवारी दि. ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सुमारे चार वाजताच्या सुमारास त्यांनी आपल्या शेतातच कीटकनाशक प्राशन केले. विष प्राशन केल्याचे कुटुंबियांच्या लक्षात येताच त्यांना तातडीने फुलसावंगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी यवतमाळ जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे तीन दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर शुक्रवारी सकाळी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मारोती यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, भाऊ, वहिनी व दोन बहिणी असा परिवार आहे. या घटनेमुळे निंगनूर परिसरात शोककळा पसरली आहे. प्रशासनाने पंचनामा करून पीडित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# कोडपाखेडी कचरा डेपोला ग्रामस्थांचा विरोध

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**झरी जामणी** : कोडपाखेडी येथे प्रस्तावित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला (कचरा डेपो) स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. हा प्रकल्प कायदे, नियम, भारतीय संविधानाच्या तरतुदींना विरोधात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. प्रकल्प तात्काळ रद्द करण्याची ठाम मागणी करीत नगरपंचायत झरी जामणीच्या मुख्याधिकाऱ्यांना कडक कायदेशीर आक्षेपांसह अंतिम प्रतिउत्तर सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, लोकवस्ती, शेतीयोग्य जमीन तसेच आदिवासी बहुल परिसराच्या सान्निध्यात कचरा डेपो उभारणे हे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ मधील स्वच्छ, सुरक्षित व सन्मानपूर्वक जीवनाच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे. या प्रकल्पामुळे नागरिकांच्या आरोग्य, पर्यावरण आणि उपजीविकेवर दूरगामी दुष्परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी लोकवस्तीपासून सुरक्षित अंतर, जलस्त्रोतांपासून दूर व पर्यावरणदृष्ट्या योग्य जागेची निवड करणे बंधनकारक आहे. मात्र कोडपाखेडी येथील प्रस्तावित जागा या निकषांवर अपुरी ठरत असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ नुसार आवश्यक असलेला पर्यावरणीय परिणाम अभ्यास (EIA), सार्वजनिक हरकती प्रक्रिया व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची पूर्वपरवानगी न घेता प्रकल्प पुढे रेटण्यात येत असल्याने संपूर्ण प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. कोडपाखेडी हे आदिवासी बहुल क्षेत्र असून पेसा कायद्यानुसार ग्रामसभेची पूर्वसंमती आवश्यक असताना कोणतीही वैध ग्रामसभा न घेता निर्णय लादण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे हा निर्णय कायदेशीरदृष्ट्या शून्य व अवैध असल्याचे नमूद करण्यात आले आहे. कचरा डेपोमुळे दुर्गंधी, रोगराई, भूजल प्रदूषण व सार्वजनिक आरोग्याला गंभीर धोका निर्माण होणार असल्याने हा प्रकल्प जनहिताच्या विरोधात असल्याचा ठाम दावा करण्यात आला आहे. प्रस्तावित जागेबाबत आर्थिक गैरव्यवहार व संगनमताचा संशय व्यक्त करत स्वतंत्र चौकशीची मागणीही करण्यात आली आहे.

हा प्रकल्प तात्काळ व कायमस्वरूपी रद्द न केल्यास जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आदिवासी विकास विभाग तसेच उच्च न्यायालय व राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे (NGT) दाद मागून लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. हे निवेदन किशोर गणपतराव राऊत व केतन प्रभाकर कडू यांनी सादर केले आहे.

# लोकशाही टिकवायची असेल तर राजकारणात वैचारिक देवाणघेवाण गरजेची – हाजी युसुफ पुंजानी

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**आर्णी** : निवडणुकीत जय-पराजय हा लोकशाही प्रक्रियेचा भाग आहे. विजयी उमेदवारांनी जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देत विकासाची दिशा ठरवावी, तर पराभूत उमेदवारांनी खचून न जाता पुन्हा जनतेत मिसळून काम करावे. निवडणुका संपल्यानंतर पक्ष, भाषा, धर्म, जात यांची भिंत ओलांडून केवळ जनहितासाठी संवैधानिक पदाचा उपयोग झाला, तरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असलेली लोकशाही खऱ्या अर्थाने नांदेल, असे प्रतिपादन एमआयएम पक्षाचे राज्य उपाध्यक्ष व कारंजा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रतिनिधी हाजी युसुफ सेठ पुंजानी यांनी केले.



सुफी संत बाबा कंबलपोष यात्रेनिमित्त आर्णी येथे आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. नुकत्याच पार पडलेल्या नगराध्यक्ष व नगरपंचायत निवडणुकांमध्ये एमआयएम पक्षाला राज्यात मोठे यश मिळाले असून, कारंजा नगरपरिषदेत नगराध्यक्ष पदासह एकहाती सत्ता मिळवत पक्षाचा झेंडा फडकविण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित नगरसेवकांसह युसुफ पुंजानी आर्णी येथे आले असता इमरान बेग यांच्या निवासस्थानी हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

पुढे बोलताना पुंजानी म्हणाले की, राज्यात किंवा देशात बहुजन समाजावर अन्याय-अत्याचार झाल्यास संसदेत ठामपणे आवाज उठवणारे बॅरिस्टर असदुद्दीन ओवेसी हे एकमेव नेते आहेत. त्यांच्या भूमिकेमुळे एमआयएम पक्षाला राज्यात व देशात मोठी लोकप्रियता मिळत आहे. एमआयएम हा पक्ष केवळ अल्पसंख्याक समाजापुरता मर्यादित आहे, हा गैरसमज असून अलीकडील निवडणुकांत सर्व धर्मीय व सर्व भाषिक मतदारांनी पक्षाला पाठिंबा दिल्याचे चित्र दिसून आले आहे. त्यामुळे अनेक युवक पक्षात येण्यासाठी उत्सुक असून, आगामी काळात पक्षवाढीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या कार्यक्रमास कारंजा नगरपरिषदेचे शिक्षण सभापती जाकीरभाई, आर्णी नगरपरिषदेचे सभापती अन्वर पठाण, सदस्य सलीम सागवान, एजाजभाई, शोएब शेख, सलमान विराणी, मुन्ना ठेकेदार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आर्णी पत्रकार संघाच्या वतीनेही युसुफ पुंजानी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार हाजी कादर दोसानी यांनी केले, तर आभार इमरान बेग यांनी मानले.

# नगर परिषदेची पहिलीच सर्वसाधारण सभा तहकूब

## डॉ.नीरज वाघमारेंनी महिलांच्या प्रश्नावर वेधले लक्ष

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**यवतमाळ** : यवतमाळ नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांची पहिलीच सर्वसाधारण सभा सोमवारी (दि. ९) आयोजित करण्यात आली होती. मात्र नगर परिषदेचे मुख्याधिकारी गैरहजर राहिल्याने ही सभा तहकूब करण्यात आली. त्यामुळे नव्या नगर परिषदेच्या पहिल्याच सभेत कोणताही ठोस निर्णय किंवा अधिकृत चर्चा होऊ शकली नाही.

नगर पालिकेत्त सत्ता स्थापन झाल्यानंतर नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांनी ९ फेब्रुवारी रोजी नगर परिषदेत सर्व साधारण सभेचे आयोजन केले होते. नगरपालिका निवडणुकांनंतर होणाऱ्या या पहिल्या सभेकडे शहरवासीयांचे विशेष लक्ष लागले होते. शहरातील विकासकामे, नागरी सुविधा, प्रशासनाची पुढील दिशा याबाबत महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होण्याची अपेक्षा होती. मात्र मुख्य अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे सभागृहात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले. सभा रद्द झाली असली तरी सभागृह परिसरात विविध नागरी व सामाजिक प्रश्न ऐरणीवर आले. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष, गटनेते तथा नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनी यावेळी महिलांसाठी सार्वजनिक प्रसाधनगृहांचा प्रश्न तसेच सफाई कामगारांच्या किमान वेतनाचा मुद्दा उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यांनी पांढऱ्या सदऱ्यावर ठळक अक्षरांत प्रश्न लिहून प्रतीकात्मक आंदोलन केले. यामुळे सभागृह परिसरात तसेच प्रसारमाध्यमांमध्ये चर्चेला उधाण आले. तसेच काँग्रेसच्या गटनेत्या वैशाली सवई यांनी इतिवृत्त वेळेवर मिळत नसल्याचा आरोप करुन कर्मचा-यांवर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच सभेचा कोरम पुर्ण असूनही मुख्याधिकारी गैरहजर असल्याचे कारण समोर करुन नगर परिषदेची पहिलीच सर्वसाधारण सभा रद्द केली. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत असून, पुढील सभा कधी आणि कोणत्या अजेंड्यावर होणार, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.




# पिंपळखूटा येथील जिल्हा परिषद शाळेत 'सिखें उत्सव'

## विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाने पालक भारावले

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**यवतमाळ** : बाभूळगाव तालुक्यातील पिंपळखूटा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकताच 'सिखें इंडिया उत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि वर्षभरातील त्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे सादरीकरण करण्यासाठी या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात 'सिखे रॅली' काढून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. त्यानंतर शाळेत मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मुख्य कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष कामिनी घोंगडे, प्रवीण घोंगडे, प्रफुल्ल इंगळे, मुख्याध्यापक मनोज श्रीवास, 'सिखें'चे सहायक जिल्हा व्यवस्थापक नितीन पखाले आदी उपस्थित होते.

सिखेंच्या वतीने शाळेत भाषा आणि गणित विषयावर शिक्षकांसोबत काम केले जाते. तर विद्यार्थ्यांना कार्यपुस्तिका देवून विविध घटक शिकवले जातात. या उपक्रमात विद्यार्थी वर्षभर काय शिकले याचे विविध मॉडेल विद्यार्थी प्रदर्शनातून मांडतात. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी गणितातील अपूर्णांकाच्या विविध संकल्पना, भाषेतील गोष्टीचे घटक, पुस्तक अशा विषयांवर आधारित प्रकल्प सादर केले. पालकांनी विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी अतिशय समर्पक आणि आत्मविश्वासाने उत्तरे दिली. पाल्यांची प्रगती आणि त्यांचा बोलका आत्मविश्वास पाहून पालकांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता विषयाची मूळ संकल्पना सखोलपणे समजून घेतली व त्याचे सादरीकरण केले तसेच गणितातील कठीण भागही दृश्यमान स्वरूपात सहजपणे समजावून सांगितला, अशी प्रतिक्रिया पालकांनी दिली.

संचालन शिक्षिका श्रद्धा चौरे यांनी केले. प्रदर्शनीसाठी सिखेंचे जिल्हा व्यवस्थापक संभाजी भिसे यांच्या मार्गदर्शनात कोच गोवर्धन गुल्हाने यांच्यासह शाळेतील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



# सानिका चांदसूर्य वक्तृत्व स्पर्धेत तृतीय

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**वणी** : वणी येथील संस्कार भारती समिती, सागरझेप बहुउद्देशीय संस्था आणि जैताई देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व. श्री माधवराव सरपटवार स्मृतिप्रीत्यर्थ १८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत विवेकानंद विद्यालय, कायरची विद्यार्थिनी कु. सानिका मनोहर चांदसूर्य हिने "थोर पुरुषांचे विचार – काळाची गरज" या विषयावर आपले विचार मांडून "अ" गटातून तृतीय क्रमांक पटकावला.

वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी स्व. माधवराव सरपटवार स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित भारत माता पूजन व्याख्यानमालेत देण्यात आले. "राष्ट्रासाठी महात्मा फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य" या विषयाचे वक्ते प्राचार्य डॉ. दिलीप चौधरी यांनी सानिकाला पारितोषिक देऊन गौरविले.



यावेळी विवेकानंद विद्यालय, कायमचे अध्यक्ष: जयंतराव चौहान, उपाध्यक्ष: ग. कृ. टोंगे सचिव: स. वि. घुले, संचालक: रा. पो. गोंडलावार, रा. आ. चौहान, ग. ल. मांडवकर, दिलीप भ. मालेकार, म. भ. टिकनायत, अविनाश ठावरी, मुख्याध्यापक: सुरेंद्र इखारे, शिक्षक: मधुकर घोडमारे, रविकांत गोंडलावार, सोनाली भोयर, शिक्षकेत्तर कर्मचारी: सचिन टोंगे, मधुकर कोडापे, दिलीप कांदसवार, आकाश बोरूले , शिक्षक, पदाधिकारी व गावकऱ्यांनी सानिका चांदसूर्यच्या यशाचे मनापासून कौतुक केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अधिकाऱ्यांनी ‘स्व-दान’साठी बोगस लाभार्थ्यांना दिले ‘अनुदान’




# पोकरा घोटाळा, पुरावे झाले गोळा...
# नकली प्रस्ताव मंजूर, असली नामंजूर !
## *कार्यवाहीचा आदेश धडकला, कारवाई कधी होणार

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यातील पोकरा घोटाळ्याने कृषी विभागाची झोप उडाली आहे. रिसोड तालुक्यातील पोकरा गैरप्रकरणाने तर, कृषी विभागाच्या कार्यप्रणालीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. क्षेत्रीय पातळीवरील काही कमिशनखोर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दलालांना हाताशी धरून शेतकऱ्यांच्या हक्कावरच घाव घातला असल्याचे निष्पन्न होत आहे. ग्राम पातळीवरील कृषी सहाय्यकांपासून ते थेट जिल्हा कृषी कार्यालयापर्यंत या घोटाळ्याचे धागेदोरे असल्याचा संशय आता व्यक्त केला जात आहे. बोगस फळबाग लागवड प्रकरणी विभागीय कृषी सहसंचालकांनी बोगस अनुदान वसुली करण्यासंदर्भात कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. मात्र यावर कारवाई कधी होणार ? हा प्रश्न अद्यापही गुलदस्त्यातच आहे. त्यामुळे या गैरप्रकरणात उपविभागीय कृषी अधिकारी सुद्धा गुंतले असल्याचा संशय निर्माण होत आहे.

रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील गाजलेल्या पोकरा योजनेतील गैरप्रकरणाने कृषी विभागाची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. सबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचाराची चिरफाड करणारे हे प्रकरण थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यापर्यंत पोहचले आहे. मात्र आपल्या विभागाची नामुष्की झाकण्यासाठी वरिष्ठांनी केलेला प्रयत्न कारवाईच्या कसुरातून अधोरेखित होत आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असतांना आणि या गंभीर प्रकरणाचा जिल्ह्यातील सर्वच माध्यमांनी पाठपुरावा करूनही जिल्हा प्रशासन गप्प आहे. ही बाब सबंधित प्रशासनासाठी लज्जास्पद ठरत आहे. सदर प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास या घोटाळ्याची एसआयटी मार्फत नव्याने चौकशी होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या गंभीर प्रकरणाचे तक्रारदार यांचे समाधान न झाल्यामुळे आता हे प्रकरण महाराष्ट्राचे लोकायुक्त यांच्याकडे दाखल होणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे लवकरच पोकरा घोटाळ्याचे बिंग फुटणार असून भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पितळ उघडे पडणार आहे.









तालुका कृषी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आर्थिक तुंबड्या भरून काढण्यासाठी क्षेत्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात अफरातफर केली आहे. काही ठराविक दलाल हाताशी धरून मर्जीतल्या लोकांना खिरापत वाटल्यागत लाखों रुपयांच्या अनुदानाची खैरात वाटली आहे. त्यासाठी नकली प्रस्ताव मंजूर करून असली प्रस्ताव जाणीवपूर्वक धुडकावण्यात आले आहेत. परिणामी शेकडो पात्र लाभार्थी पोकरा योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

ज्या पात्र लाभार्थ्यांनी विहीर, शेडनेट, फळबाग लागवडचे प्रस्ताव सादर केले होते. अशा खऱ्या लाभार्थ्यांना केवळ कमिशन मिळत नसल्याने डावलण्यात आले आहे. तर शेडनेट, औजारे बँक, धान्य सुकवणी शेड आणि ठिंबक संच व तुषार संचाच्या नावावर ’ अर्धे तुम्ही अर्धे आम्ही ’ तंत्राचा वापर करून कृषी सहाय्यक, पर्यवेक्षक आणि तालुका कृषी अधिकारी मालामाल झाले आहेत. या गंभीर प्रकरणाचे सर्व सबळ पुरावे लोकायुक्त यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती तक्रारदार यांनी दिली आहे.

### शेलुखडसे येथील गट नंबर ६ ३ ३ मधील कथित विहीर नियमबाह्यच...

सदर पोकरा गैरप्रकरणातील गट नंबर ६३३ मधील ती कथित विहीर नियमबाह्यच आहे. त्या गटात वडिलोपार्जित असलेली जुनी विहीर अस्तित्वात असल्याचे सबळ पुरावे पुरवणी तक्रारीत पुन्हा सादर करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने पतीच्या नावावर जुनी विहीर असताना त्याच गटात पत्नीच्या नावावर भारतातील कुठल्याही योजनेतून विहीर घेता येत नाही. हा शासकीय नियम आहे. व तो प्रत्येक योजनेच्या मार्गदर्शक सूचनामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. मग कथित विहिरीच्या प्रस्तावास कोणती निरंक सात/ बारा जोडली याची व बोगस फळबाग लागवड अनुदानासाठी जिओ टॅग लोकेशनचे फोटो कुठले जोडले या दोन गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी होणे खुप गरजेचे आहे. ज्या पात्र लाभार्थ्याने दि.३०/०१/२०२० रोजी असली प्रस्ताव दाखल केला होता. त्याचा संकेतांक ५३१३६०/३.३.४/९५१७५० हा आहे. सदर विहीर कारण नसतांना नामंजूर करण्यात आली आहे. व ज्या एकाच कुटुंबात लाखों रुपयांचे अनुदान दिले त्याच कुटुंबात गट नंबर ६३३ मध्ये नियमबाह्य विहीर देण्याचे कारण काय? याची सुद्धा सखोल चौकशी करून दोषींवर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल होणे खुप गरजेचे आहे. अशा नियमबाह्य व गैरप्रकारात जो पर्यंत प्रशासन कठोर कारवाई करणार नाही तो पर्यंत शासकीय योजनांतील भ्रष्टाचाराला आळा बसणार नाही! असे सर्व सामान्य नागरिक बोलत आहेत.




## थोडक्यात

### वित्तीय साक्षरता सप्ताहाची जनजागृती

डिजिटल चित्ररथाला हिरवी झेंडी



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

सामान्य नागरिकांमध्ये आर्थिक व्यवहारांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, सुरक्षित व जबाबदार बँकिंगची सवय लागावी, या उद्देशाने वित्तीय साक्षरता सप्ताह २०२६ चे आयोजन दि. ९ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत करण्यात आले आहे. 'सुरक्षित बँकिंग की ओर पहिला कदम' या संकल्पनेवर आधारित या सप्ताहाचा शुभारंभ जनजागृती प्रचार डिजिटल चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन भारतीय रिझर्व्ह बँक, नागपूरचे विकास अधिकारी हर्षल चितळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अग्रणी जिल्हा व्यवस्थापक यशवीर कुमार, जिल्हा विकास व्यवस्थापक शंकर कोकडवार, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सहाय्यक संचालक पंकज दिनवले, बँक ऑफ महाराष्ट्र वाशिमचे अमित वढेरा, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे मंगेश बोडाल्डे, बँक ऑफ इंडियाचे अविनाश सरकटे तसेच आयसीआयसीआय बँकेचे रूपेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते. वित्तीय साक्षरता सप्ताहाच्या माध्यमातून सुरक्षित बँकिंग व्यवहार, डिजिटल आर्थिक व्यवहारांतील खबरदारी, सायबर फसवणूक प्रतिबंध, बचत व आर्थिक नियोजन याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. प्रचार रथाच्या माध्यमातून शहर व ग्रामीण भागात जाऊन नागरिकांपर्यंत वित्तीय साक्षरतेचा संदेश पोहोचवण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## सामाजिक वनिकरण विभागात भ्रष्टाचार;
# चौकशीसाठी धरणे आंदोलन !

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●




नांदेड सामाजिक वनिकरण परिक्षेत अंतर्गत घनवन , रोपवन , रोपवाटीका रोप लावगड या कामात करोडो रुपयाचा भ्रष्टाचार झाला त्याची चौकशी होणे साठी दानिस नेते तथा जेष्ठ समाजसेवक रमेश भालेराव नांदेड जिल्हाधिकारी कार्यालया समोर दि २३ जानेवारी २०२६ पासुन बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. या कामात अनियमितता आढळून आली असून कामे न करता बोगस कामे केल्याचे दाखवून तसे अभिलेखे तयार करून कर्मचारी व अधिकारी यांनी मोठ्या प्रभाणात भ्रष्टाचार केला आहे ’ त्या बद्दल भालेराव हे आंदोलन छेडत आहे.

आज त्यांच्या आंदोलनाचा पंधरावा दिवस आहे , जो पर्यत कामाचे अभिलेखे जप्त करून कार्यवाही होत नाही तो पर्यत हे आंदोलन सुरूच रहणार असल्याचे त्यांनी बोलून दाखविले . या विभागात अनेक कामात गैरप्रकार झाला आहे त्याची चौकशी होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले .

# श्री. संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव

### महोत्सव नियोजनात कोणतीही त्रुटी नको - जिल्हाधिकारी * नियोजनाचा आढावा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव २०२६ हा जिल्ह्याच्या सांस्कृतिक परंपरेचा व पर्यटन विकासाचा महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याने, त्याच्या नियोजन व अंमलबजावणीत कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.



श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव २०२६ च्या नियोजनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा सभा संपन्न झाली. या सभेत महोत्सवाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या सर्व तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांची संभाव्य मोठी उपस्थिती लक्षात घेता, सुरक्षा, वाहतूक, आरोग्य व मूलभूत सुविधा याबाबत सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने व काटेकोरपणे काम करावे, असे त्यांनी नमूद केले.

या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, कारंजा उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संग्राम जगताप आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# अपघातात धोडप येथील दुचाकीस्वार विद्यार्थी ठार

### जालना–पुलगाव राष्ट्रीय महामार्गावरील त्रुटींमुळे अपघात; प्रशासनाच्या दुर्लक्षावर गंभीर प्रश्नचिन्ह

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

दुचाकीने मित्रासोबत कॉलेजला जात असताना गाडी स्लिप होऊन झालेल्या भीषण अपघातात दुचाकीचालक विद्यार्थी ठार झाल्याची घटना ९ फेब्रुवारी रोजी सकाळी केनवड परिसरात घडली. सदर अपघात शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत घडल्याची नोंद आहे. हा अपघात केवळ वाहन घसरल्यामुळे नव्हे, तर जालना–पुलगाव राष्ट्रीय महामार्गावरील गंभीर त्रुटींमुळे घडल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, रिसोड तालुक्यातील धोडप बोडखे येथील संचित प्रल्हाद बकाल हा पेनबोरी येथील भुतेकर नामक मित्रासोबत दुचाकीने आमखेडा येथील कृषी विद्यालयात जात होता. केनवडजवळ पोहोचत असताना भरधाव वेगात असलेली दुचाकी अचानक स्लिप होऊन रस्त्यावर आदळली. या अपघातात चालक संचित याला गंभीर दुखापत झाली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करून उपचारासाठी हलविले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. सोबतचा मित्र किरकोळ जखमी झाला आहे. या ठिकाणी महामार्गाची अवस्था अत्यंत धोकादायक असल्याचे चित्र आहे. वळण रस्ता असतानाही दिशा फलक व सूचनाफलक नसल्याने वाहनचालकांना पुढील रस्त्याचा अंदाज येत नाही. रस्त्याच्या कडेला मोठे गड्डे व खोल खाचा पडलेल्या असून काही ठिकाणी रस्ता अरुंद झाला आहे. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाढलेल्या झाडे-झुडपांमुळे दृश्यता कमी झाली असून उपलब्ध फलकही दिसेनासे झाले आहेत. पुलांवर व रस्त्याच्या कडेला कठडे नसल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. या सर्व कारणांमुळे समोरासमोर येणाऱ्या वाहनांना सुरक्षितपणे जाण्यास जागा मिळत नाही आणि अचानक ब्रेक किंवा वळण घेतल्याने अपघात घडत आहेत. नागरिकांच्या मते, वेळेत दिशा फलक, सूचनाफलक, झाडे-झुडपे हटवणे, गड्डे बुजवणे व सुरक्षित कठडे उभारणे याबाबत कार्यवाही झाली असती, तर हा अपघात टाळता आला असता. संचित हा अत्यंत हुशार विद्यार्थी असून घरात एकुलता एक होता. त्याच्या अकाली मृत्यूमुळे धोडप गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.







दुपारी शोकाकुल वातावरणात त्याच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेनंतर जालना–पुलगाव राष्ट्रीय महामार्गावरील केनवड परिसरातील रस्त्याच्या स्थितीकडे प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी आणि आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिक व वाहनधारकांकडून होत आहे.

# देशी पिस्टलसह एकाला अटक,
# एलसीबीची कारवाई !



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशिम शहरालगत असलेल्या जागमाता परिसरातून देशी बनावट पिस्टल बाळगणाऱ्या एका तरुणाला वाशीम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्याच्याकडून एक देशी बनावट पिस्टलसह २ जिवंत काडतुस आणि एक मॅक्झिन देखील जप्त करण्यात आली आहे. पवन चिंतामण जोरेवार वय २२, रा. पंचशील नगर, वाशीम असे अटक आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी केलेल्या या पिस्टल कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.



दि.०९ फेब्रुवारी रोजी वाशीम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीनुसार एक तरुण वाशीमच्या पंचशील नगरात पिस्टल बाळगून वावरत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी आरोपीचा पंचशील नगरात शोध घेतला असता, तो जागमाता येथे असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलिसांनी जागमाता येथील महादेव मंदिराजवळ धाव घेतली असता, एक युवक संशयितरीत्या आढळून आला. दरम्यान त्याला ताब्यात घेवून झडती घेण्यात आली. त्याच्या जवळ १ बनावट देशी पिस्टल, २ जिवंत काडतुस आणि १ मॅक्झिन असा मुद्देमाल मिळून आला. मिळून आलेला मुद्देमाल जप्त करण्यात आलं असून आरोपी पवन जोरेवार विरुद्ध विविध कलमान्वये वाशीम शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आलं आहे. ही पिस्टल कोणाकडून आणि कशासाठी आणण्यात आली होती.

याचा पुढील तपास वाशीम शहर पोलीस करीत आहे. ही पिस्टल बनावट असले तरी त्यासोबत काडतुसे आढळल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश धोत्रे आणि त्याच्या पथकाने केली.

## ‘नारीशक्ती’ पुढे सर्व झुकले...
# दारूवाले हारले, ग्रामस्थ जिंकले !

***ब्रम्हा येथे नशामुक्तीचा ऐतिहासिक निर्णय**
***५२३ विरुद्ध १४ मतांनी वाईन बार बंद करण्याचा कौल**

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशिम तालुक्यातील ब्रम्हा (ब्रम्हा फाटा) येथे ग्रामस्थांनी नशामुक्तीच्या बाजूने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. गावाच्या हद्दीत सुरू असलेला वाईन बार बंद करण्यासाठी घेण्यात आलेल्या मतदानात बार बंद करण्याच्या बाजूने ५२३ मते पडली, तर बार सुरू ठेवण्यासाठी केवळ १४ मते मिळाली.






गावाच्या हितासाठी यापूर्वी तीन वेळा ग्रामसभा घेण्यात आल्या होत्या. या ग्रामसभांमध्ये बार बंद करण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला होता. मात्र, प्रशासकीय पातळीवर निर्णय न झाल्याने ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागितली. त्यानंतर प्रशासनाने मतदान घेण्याचा निर्णय घेतला. या मतदानात गावातील महिलांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. एकूण ८१६ महिला मतदारांपैकी बहुसंख्य महिलांनी बार बंद करण्याच्या बाजूने मतदान केले. काही मते बाद झाली असली तरी निकाल एकतर्फी ठरला.

या निर्णयामुळे ब्रम्हा गाव नशामुक्तीच्या दिशेने एक पाऊल पुढे गेले असून, हा निर्णय इतर गावांसाठीही मार्गदर्शक ठरणार असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## नॅशनल तायकोन्डो चॅम्पियनशिपमध्ये जासनोर कौर कोचर हिचे यश



**मूर्तिजापूर :** येथील इंटरनॅशनल स्कूल ऑफ इंटिग्रेटिव्ह एज्युकेशन शाळेतील इयत्ता पहिलीत शिकणारी चिमुकली जासनोर कौर बालबीरसिंग कोचर हिने नॅशनल तायकोन्डो चॅम्पियनशिपमध्ये द्वितीय क्रमांक पटकावत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

अत्यंत कमी वयात राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत जासनोरने आपले कौशल्य, जिद्द आणि आत्मविश्वास सिद्ध केला आहे. तिच्या या यशामुळे शाळेचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्वल झाले असून मुर्तीजापुरच्या क्रीडा क्षेत्राला नवी ओळख मिळाली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल जासनोर कौर हिचे पालक, प्रशिक्षक तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ प्रणाली भटकर याच्या सह शाळेतील शिक्षकांनी तिचे अभिनंदन केले.

# पोलिस भरतीच्या 161 जागांसाठी 11 हजार 784 अर्ज

प्रतिनिधी १० फेब्रुवारी





**अकोला:** पोलिस दलात १६१ जागांची भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. पोलिस अधीक्षक अर्चित पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पारदर्शकतेवर भर देण्यात आला आहे. ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ५ वाजेपासून अकोला पोलीस मुख्यालय व वसंत देसाई स्टेडियम येथे सुरू होणार आहे.

भरतीस्थळी उमेदवारांच्या सोयीसाठी सूचनाफलक, पिण्याचे पाणी, फिरती प्रसाधनगृहे, वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका, उपाहारगृह व पी.ए. सिस्टिम उपलब्ध आहे. उमेदवारांचे आधारकार्ड, ओळखपत्र व डिजिटल फोटोद्वारे तपासण्यात येणार असून, बायोमेट्रिक प्रणाली कार्यान्वित राहणार आहे. गैरप्रकार आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

शारीरिक मोजमाप व मैदानी चाचण्या ४० हून अधिक सीसीटीव्ही व व्हिडीओ कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली पार पडणार आहेत. उंची व छाती मोजण्यासाठी वापरण्यात येणारी उपकरणे वैधमापन शास्त्र विभागाकडून प्रमाणित आहेत. उमेदवारांना अंतिम निर्णय मान्य नसल्यास दोन वेळा अपीलची संधी देण्यात येणार आहे. १६०० मीटर, ८०० मीटर व ५०० मीटर धावण्याच्या चाचण्यांसाठी आधुनिक 'आरएफआयडी' प्रणाली वापरण्यात येणार असून, उमेदवारांच्या सुरक्षिततेसाठी तज्ज्ञ वैद्यकीय पथक सतत उपस्थित राहणार आहे. स्पाईक शूज वापरण्यास मनाई असून, सामान्य स्पोर्ट्स शूज परवानगीयोग्य असतील. कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी, ३०० पोलीस अंमलदारांसह एकूण ४०० पेक्षा अधिक कर्मचारी तैनात राहणार आहेत. स्टेरॉईड किंवा उत्तेजक द्रव्ये आढळल्यास वैद्यकीय तपासणीनंतर कठोर कारवाई केली जाईल.

भरती प्रक्रिया पारदर्शक, सुरक्षित व नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्याचा निर्धार पोलीस प्रशासनाने केला आहे.

## मजिप्रा कार्यालय तोडफोड प्रकरणी शिवसेना जिल्हाप्रमुखासह ११ जणांची निर्दोष मुक्तता

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**कुटासा:** दहिहांडा परिसरात सतत पाणी टंचाई असल्याने दिनांक १३/०१/२०१६ रोजी दहिहांडा जिल्हा परिषद सर्कलचे सदस्य तथा शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल दातकर पंचायत समिती सदस्य गजानन वानखडे यांचे सह अनेक नागरिक समस्या घेऊन कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण अकोला यांच्या कार्यालयात गेले असता अधिकाऱ्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने व पाणी समस्येचे गांभीर्य नसल्याने आक्रमक होत आंदोलनकर्ते यांनी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालयाची तोडफोड करून कार्यालयास कुलुप ठोकले. त्यावेळी सिव्हील लाईन पोलीस स्टेशन ला गुन्हा दाखल करून जिल्हा परिषद सदस्य तथा जिल्हाप्रमुख गोपाल दातकर पंचायत समिती सदस्य गजानन वानखडे सर्कलप्रमुख अविनाश राऊत अकोला तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक गजानन चराटे अनिल मोहरकार गोकुल कंडाळे सुधाकर शिरसाट निलेश डहाके गुलाबराव शिरसाट पांडुरंग पाटकर व सैयद शारीक यांना जिल्हा परिषद परिसरात अटक करण्यात आली होती.

## केजडीवाल मिल्क शेकस् चा शानदार शुभारंभ

### आळशी प्लॉट मध्ये रविवार पासून ग्राहक सेवेत दाखल

प्रतिनिधी १० फेब्रुवारी




**अकोला:** उन्हाळा सुसह्य व्हावा म्हणून शीतपेयांची मागणी वाढलेली असते. आणि चोखंदळ ग्राहकांसाठी केजडीवाल मिल्क शेकस् हे नवीन प्रतिष्ठान रविवार पासून सुरू झाले आहे. आळशी प्लॉट मध्ये यस बँकेच्या बाजूला स्वादिष्ट शेकस् चा आनंद ग्राहकांना घेता येईल. मँगो, व्हेनिला, बटरस्कॉच यासह विविध फ्लेवर्स उपलब्ध राहणार आहेत.

केजडीवाल मिल्क शेकस् च्या शुभारंभ प्रसंगी सिद्धेश शर्मा आणि आदित्य केजडीवाल यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तसेच नवीन प्रतिष्ठान मधील वैशिष्ट्ये सांगितली. ग्राहकांना सर्वोत्तम सेवा तसेच समाधान देण्याचा प्रयत्न राहील असे सांगितले. आम्ही परत आलो आहोत असे सांगताना सिद्धेश शर्मा आणि आदित्य केजडीवाल यांचा संकल्प दिसून येतो. केजडीवाल मिल्क शेकस् द्वारे अकोलेकर ग्राहकांना उत्तम सेवा देण्याचा त्यांचा मानस आहे. याठिकाणी ग्राहकांनी भेट द्यावी असे आवाहन संचालकांनी केले आहे.

## ३७ वर्षांच्या न्यायलढ्याला यश, रेल्वे दरवाढ विरोधी आंदोलन प्रकरणी काँग्रेस नेते निर्दोष

प्रतिनिधी १० फेब्रुवारी



**अकोला :** रेल्वे प्लॅटफॉर्म तिकिट दरवाढीविरोधात १९८८ साली अकोला रेल्वे स्थानकावर झालेल्या आंदोलन प्रकरणात ३७ वर्षांनंतर काँग्रेसच्या आजी-माजी नेत्यांना अखेर न्याय मिळाला आहे. न्यायाधीश क्षीरसागर यांनी या प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. जनतेसाठी उभ्या राहिलेल्या काँग्रेसच्या लढ्याला न्यायालयाने दिलेली ही स्पष्ट पावती मानली जात आहे.

१९८८ मध्ये रेल्वे प्रशासनाने प्लॅटफॉर्म तिकिटाचा दर दोन रुपयांवरून पाच रुपये केल्याच्या निर्णयाविरोधात अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात आले होते. या आंदोलनावर तत्कालीन सत्तेने लाठीचार्ज करत अनेक आंदोलकांना जखमी केले होते. त्यानंतर आंदोलनकर्त्यांवर विविध कायद्यांअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले.

## नीलगायींनी केले गव्हाचे पीक फस्त उभ्या पिकांचे वन्य प्राण्यांकडून नुकसान

प्रतिनिधी १० फेब्रुवारी



**अकोला:** जिल्ह्यात वन्यप्राण्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. वन्य प्राणी शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक फस्त करीत आहेत. कडोशी शेत शिवारात तसेच अन्य भागात हा प्रकार उघड झाला आहे.

कडोशी गावातील अल्पभूधारक शेतकरी विठ्ठल तेजराव वडतकार यांनी एक एकर शेतात तीन महिन्यापूर्वी गहू पिकाची पेरणी केली होती. काल रात्री त्यांच्या शेतातील गहू नीलगायीच्या कळपाने पूर्णतः फस्त केल्याने वडतकार यांचे ७० ते ८० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. यापूर्वी सुद्धा कडोशी शेतशिवारात निलगायीच्या कळपाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. शेतकऱ्यांनी यापूर्वी वन विभाग तसेच कृषी विभागाकडे तक्रारी केल्या. परंतु अद्याप यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र स्वरूपाची नाराजी व्यक्त केल्या जात आहे. विठ्ठल वडतकार यांच्या गहू पिकाचे नुकसानी बाबत त्यांनी वन विभाग तसेच कृषी विभागाकडे आज तक्रार केली. शेतात झालेल्या नुकसानीची भरपाई तात्काळ द्यावी अशी त्यांची मागणी आहे.


## शिर्ला येथे महाशिवरात्रीनिमित्त मोफत रोगनिदान शिबिर

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**पातूर :** शिर्ला येथील सोमपुरी महाराज महाशिवरात्री उत्सव मंडळाच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त भक्तांसाठी मोफत रोगनिदान शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरात सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध आरोग्य तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत. डॉ. सागर वसतकार, डॉ. समीक्षा अधारे तसेच दमानी हॉस्पिटल, अकोला व निदान पॅथॉलॉजी, पातूरचे तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. तसेच बालरोगतज्ज्ञ डॉक्टरांचेही विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. शिबिरामध्ये मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग, सर्वसाधारण आजार यांसह नेत्र तपासणीची सुविधाही उपलब्ध राहणार आहे.

## हरभरा पिकावर अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव उत्पादन 40 ते 50 टक्के घटण्याची शक्यता

प्रतिनिधी १० फेब्रुवारी



**अकोला:** जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगाम मध्ये मोठ्या प्रमाणात हरभरा पिकाची पेरणी केली होती. परंतु शेतकरी आता आर्थिक संकटात सापडले आहेत. गेल्या काही दिवसांत हरभरा पिकावर अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांचे शेतातील हरभरा पिक पिवळे पडत आहे. हरभरा पिकाच्या उत्पन्नात ४० ते ५० टक्के घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

खरीप हंगाम मध्ये शेतकऱ्यांना सोयाबीन तसेच तूर या पिकात बराचसा आर्थिक फायदा झाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी हंगाम मध्ये हरभरा पिकाची पेरणी केली होती. हरभरा पिकावर आलेल्या अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव हा बाळापुर तालुक्यात सर्वाधिक दिसून येत आहे. खरीप हंगाम मध्ये हंगाम मध्ये झालेल्या नुकसानाची भरपाई रब्बी हंगाम मध्ये भरून निघेल अशी आशा शेतकऱ्यांना होती, परंतु अज्ञात रोगाच्या प्रादुर्भावामुळे शेतकरी हतबल झाला आहे. कृषी विभाग तसेच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या संशोधकांनी हरभऱ्यावर आलेल्या अज्ञात रोगापासून पिकाचे संरक्षण कसे करावे याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

## शेख रेहान शेख रशीद विरुद्ध एम.पी.डी.ए. अन्वये कारवाई

प्रतिनिधी १० फेब्रुवारी



**अकोला:** शहरातील पिंजारी गल्ली, कच्छी मशीद मागे राहणारा कुख्यात गुंड व गोवंश चोर शेख रेहान शेख २२ याच्या विरूद्ध एमपीडीए अंतर्गत कारवाई करून त्याला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध केले.

गोवंश जनावरांची चोरी, जनावरास ठार मारणे किंवा विकलांग करणे, अपराध्याला वाचविण्यासाठी पुरावा नाहीसा होण्याची तजवीज करणे किंवा खोटी माहिती देणे, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर यापूर्वी विविध कलमान्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती. अकोला जिल्ह्यातून हद्दपार सुध्दा करण्यात आले होते. परंतु त्याचा काहीच परिणाम झालेला नव्हता. तो प्रतिबंधक कार्यवाही करून सुध्दा जुमानत नसल्याने शेख रेहान शेख रशीद च्या गुन्हेगारी वृत्तीस आळा बसावा याकरीता पोलीस अधीक्षक यांनी त्यास स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी, अकोला यांना सादर केला होता. जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांनी सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करून तसेच स्वतःचे स्त्रोताव्दारे माहिती मिळवून कुख्यात गुंड हा धोकादायक व्यक्ती असल्याची खात्री झाल्याने त्यास एक वर्षा करीता अकोला जिल्हा कारागृहात स्थानबध्द ठेवण्याबाबतचा आदेश ०८/०२/२०२६ रोजी पारीत केला होता. त्या नुसार जिल्हा कारागृहात स्थानबध्द केले.

कार्यवाही पूर्ण करण्याकरीता पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक शंकर शेळके, उपनिरीक्षक माजीद पठाण, पोहेकॉ. ज्ञानेश्वर सैरिसे, उदय शुक्ला, तसेच अकोट फाईलचे पोलिस निरीक्षक शेख रहीम, पो. अंमलदार प्रशांत इंगळे, हर्षल श्रीवास, इम्रान शाह, अब्दुल अमीर, फैजल खान यांनी परिश्रम घेतले.

## लवकरच शहरात इलेक्ट्रिकचे कागदी बिल होणार हद्दपार !

### आता इलेक्ट्रिक बिल ऐवजी मिळणार ईमेल किंवा एसएमएस

प्रतिनिधी १० फेब्रुवारी

**अकोला:** वीज ग्राहकांना कागदी बिल देण्यासाठी दरवर्षी महावितरण ला कोट्यवधी रुपये खर्च येत असे, आणि बिल न मिळाल्याबद्दल अनेक तक्रारी येत होत्या. त्यामुळे आता अकोला जिल्ह्यात लवकरच महावितरण तर्फे गो ग्रीन प्लॅन राबवला जाणार आहे. या योजनेअंतर्गत येत्या काही दिवसात महावितरणचे बिल पूर्णपणे पेपरलेस केले जातील.

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. आणि ग्राहकांना फक्त ईमेल आणि एसएमएसद्वारे बिले पाठवली जातील. लवकरच याची सुरुवात होईल. काही दिवसातच येणारे वीज बिल पेपरलेस असेल आणि ते ग्राहकांना एसएमएस किंवा ईमेलद्वारे पाठवले जाईल, अशी माहिती मिळत आहे. जिल्ह्यात लाखो वीज ग्राहक आहेत. या लाखो ग्राहकांना महावितरण विभाग दरमहा छापील बिल त्यांच्या घरी पोहोचवत असे. तथापि कागदी बिलांमुळे महावितरणला दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च येत होता. त्याच वेळी, वेळेवर बिल मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त होत होत्या. त्यामुळे अनेक जण बिल भरण्यास टाळाटाळ करतात.

यामुळे महावितरणला वेळेवर बिल पेमेंट मिळत नव्हते. परंतु आता या तक्रारी संपतील आणि महावितरणचे कोट्यवधी रुपये वाचतील. महावितरण तर्फे लवकरच गो-ग्रीन योजना सुरू केली जाईल. गो-ग्रीन योजनेमुळे बिल पूर्णपणे पेपरलेस होईल आणि ग्राहकांना त्यांची बिल आता मोबाईलवर किंवा ग्राहक वापरत असलेल्या अन्य उपकरणांवर बिल पाठवली जातील. याची सूचना लवकरच ग्राहकांना महावितरण तर्फे दिली जाईल.

### डिजिटल बिल पाठवण्याची व्यवस्था

महावितरण तर्फे कागदी वीज बिलांचा वापर बंद करून नोंदणीकृत मोबाइल नंबरवर एसएमएस आणि ईमेलद्वारे डिजिटल बिलिंग सिस्टम लागू केली जाईल. या उपक्रमाचा उद्देश कागद वाचवणे आणि घरबसल्या वीज बिलांची त्वरित उपलब्धता सुनिश्चित करणे आहे. ग्राहक आता एसएमएस लिंकद्वारे त्यांचे बिल थेट भरू शकतील. फक्त एसएमएस लिंकद्वारे पेमेंट करता येइल.

## हरिहरपेठेत आर्ट वर्क दुकानाला आग !

### आगीत दुकानातील मशीनरी, संगणक जळून खाक

प्रतिनिधी १० फेब्रुवारी



**अकोला:** येथील हरिहरपेठेत पांडव यांच्या आर्ट वर्क दुकानाला सोमवारी दुपारी साडेचार वाजता च्या सुमारास आग लागली. या आगीत दुकानातील मशीनरी, संगणक आणि अन्य साहित्य जळून खाक झाले. आग लागली तेव्हा दुकान बंद होते.

हरिहरपेठेत मुख्य मार्गावरील दुकानातून दुपारी धूर येताना दिसला. परंतु दुकानाच्या आतील भागात आग धुमसल्याने बरेच नुकसान झाले. आपण घरी जेवायला गेलो होतो तेव्हा आग लागली. आणि परत आल्यावर दुकानातील किमती साहित्य आगीचे भक्ष्य झालेले दिसले असे प्रशांत पांडव यांनी सांगितले. याठिकाणी प्लायशीट तसेच कागदावर आर्ट वर्क करून दिले जाते असे कळते. भररस्त्यातील दुकानाला आग लागल्यामुळे याठिकाणी गर्दी झाली होती. आगीच्या कारणाचा शोध घेतला जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK